नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

जून १९

या अंकांत—

रा. सा. ना. गो. चापेकर	११३
ना. मा. सरपटवार	११५
डॉ. मो. गं. दीक्षित	११६
प्र. रा. देशपांडे	१२१
वामन जोशी	१२२
सुरेश डोळके	१२३
सौ. सुशीलाबाई कोठीवान	१२६
देवदत्त नारायण टिळक	१२८
लक्ष्मणराव जाधव	१३३

शिवाय संघवार्ता, प्रतिवृत्त, १९५१,
संमेलनाध्यक्षांचें भाषण १९५२.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

वर्ष	अंक	किंमत
सातवें	तिसरा	आठ अ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ :

प्रा. भ. श्री. पंडित

डॉ. मा. गो. देशमुख

प्रा. अ. ना. देशपांडे

श्री. मधुकर मंगरूळकर

संपादक :

वामन चोरघडे

★

पत्रव्यवहाराचा पत्ता :

"युगवाणी" कार्यालय

विदर्भ साहित्य संघ

उत्तर अंबाझरी रोड

धंतोली, नागपूर १.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अक्षय्य तृतीया

मा. गो. चापेकर

★

वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षय्य तृतीया म्हणतात. ह्या दिवशीं जप, होम, व पितृतर्पण करून दानें देण्याविषयीं मतशास्त्रांचा आदेश आहे. ह्या दिवशीं जें हें कर्म केलें जातें तें अक्षय्य असतें म्हणून ह्या तिथीला अक्षय्य तृतीया असें म्हणतात. अक्षय व अक्षय्य एकच. ह्या कर्माचें पुण्य अविनाशी असतें. बाकीच्या कर्मांचीं पुण्यें कालांतराने विनाश पावतात. पुण्याचें फल मर्यादित काळापुरतें मिळतें; अक्षय्य मिळत नाहीं; "क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति" ह्या वचनावरून सर्व पुण्यकर्मे अक्षय्य फलदायी नसतात हें स्पष्ट होतें. ह्या अक्षय्य पुण्यकल्पनेमुळे वैशाख शुद्ध तृतीयेला महत्त्व प्राप्त झालें आहे. शिवाय तो युगादि दिवस आहे. कृत युगाचा अगर त्रेता युगाचा आरंभ ह्याविषयीं मतभेद दिसतो. कोणी कृतादि म्हणतात, कोणी त्रेतादि म्हणतात. विष्णु पुराणांत युगादि दिले आहेत ते असेः—

> वैशाखमासस्य तु या तृतीया
> नवम्यसौ कार्तिकशुक्लपक्षे
> नभस्यमासस्य तमिस्रपक्षे
> त्रयोदशी पञ्चदशीच माघे

वैशाख शुद्ध तृतीया; कार्तिक शुद्ध नवमी; भाद्रपद वद्य त्रयोदशी आणि माघाची पंधरावी तीथ ही पौर्णिमा होईल किंवा अमावास्या होईल. कित्येक अमावास्या मानतात (माघे पञ्चदशी अमावास्या) ह्याचें कारण 'द्वे शुक्ले द्वे तथा कृष्णे'— दोन शुद्धांत व दोन वद्यांत युगारंभ असें वचन आहे. शुक्लादि किंवा कृष्णादि मास घ्यावा त्याप्रमाणें पौर्णिमा किंवा अमावास्या समजली जाईल. मला वाटतें पञ्चदशीचा सरळ अर्थ पौर्णिमा असाच होईल; "माघस्य पौर्णमास्यांतुघोरं कलियुगं स्मृतम्" असें ब्रह्मपुराणांत म्हटलें आहे तेंच योग्य दिसतें. परंतु वरील श्लोकांत कोणत्या युगाचा कोणता आरंभ हें स्पष्ट सांगितलेलें नाही. चार युगांचा अनुक्रम कृत, त्रेता, द्वापार व कलि असा आहे. ह्या अनुक्रमानेच वरील आरंभ वर्णिले आहेत असें मानणें युक्त होईल. ह्यावरून वैशाख शुद्ध तृतीया हाच कृतयुगादि समजला पाहिजे. तथापि पंचांगांत वेगळा प्रकार दिसतो. विष्णुपुराण व टिळक पंचांग ह्यांतील आरंभ येणेंप्रमाणें :—

	विष्णु पुराण	युग	टिळक पंचांग शके १८७३	युग
१	वैशाख शुद्ध ३	कृत	वैशाख शुद्ध २	त्रेता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२	कार्तिक शुद्ध ९	त्रेता	कार्तिक शुद्ध ९	कृत
३	भाद्रपद वद्य १३	द्वापार	भाद्रपद वद्य १३	कलि
४	माघ वद्य ३० (अगर शुद्ध १५)	कलि	माघ वद्य ३०	द्वापार

पंचांगांतील युगादींना आधार कोणता मला माहीत नाही. धर्मसिंधूंत अक्षय्य तृतीया ही कृतयुगाची आरंभतिथि म्हणून दिली आहे. ज्या कर्माचें पुण्य अक्षय्य असतें तें कर्म कृतयुगारंभींचें असणेंच अधिक संभवनीय आहे. पौर्णिमांत मास व अमान्त मास हे दोन प्रकार रुढ झाले. तसेंच तिथि म्हटली म्हणजे एक दिवस असेल कीं दोन दिवस असेल. तेव्हा कोणती घ्यावयाची ह्याविषयींचा मतभेद. ह्या कारणांनी तसेंच भानगडी व गुंतागुंत करून अवघडपणा आणण्याच्या हौसेनें आमच्या शास्त्रकारांनी एकवाक्यता व सुगमपणा ह्यांना फाटा दिला आहे.

युगारंभीं श्राद्ध करावें असा नियम आहे. "युगादिषु च दुःस्वप्नें जन्मर्क्षे ग्रहपीडिते। प्रौष्ठपदासिते पक्षे श्राद्धं कुर्वीत यत्नतः" श्राद्धाच्या अभावीं तिलतर्पण तरी करावें. अर्थात् हें पितृकर्म आहे. पितृदिनीं देवकर्म वर्ज असतें. तथापि अक्षय्य तृतीया अपवादात्मक आहे. त्या दिवशीं देव व पितर ह्या दोघांनाहि एकाच वेळीं तृप्त करावयाचें असतें. हें युगश्राद्ध अपिंडक असतें. ह्यावरून हें प्रामुख्यानें देवकर्म आहे असें वाटतें. कारण पिंडदान हा श्राद्धाचा सर्वांत जुना प्रकार होय. अक्षयतृतीयेखेरीज दुसऱ्या युगादि दिवशीं श्राद्ध करण्याची अगर दानें देण्याची वहिवाट नाही. ह्यावरूनहि कृतयुगाचाच आद्य दिवस अक्षय्य तृतीया होय असें अनुमान करण्यास हरकत नाही.

अक्षय्यतृतीयेला कुंभदान करण्याची वहिवाट आहे. देवांना उद्देशून कुंभदान ब्राह्मणांना करावयाचें असतें. पितरांना मात्र कुंभ द्यावयाचा. पितर कुंभ घेण्यास येत नाहीत म्हणून तो ब्राह्मणांना मिळतो ही गोष्ट वेगळी. हा उदकुंभ म्हणजे उदकानें भरलेला घडा असतो. वसंत माधव देवता-प्रीत्यर्थ हें उदकुंभदान करण्यांत येतें. वसंत ऋतूंत कृत युगाचा प्रारंभ झाला असें ह्यावरून म्हणतां येईल. उत्तर हिंदुस्थानांतून वैशाख महिन्यापासून संवत्सराला कित्येक ठिकाणीं आरंभ होतो हेंहि ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. बुधवार व रोहिणी नक्षत्र अक्षय्य तृतीयेला असल्यास तो योग विशेष पुण्यकारक समजतात. कदाचित् वैशाख शु॥ ३ बुधवार, रोहिणी नक्षत्र हा कृतयुगाच्या आरंभीं योग असेल. चालू पंचांगांत युगादि दिले आहेत ते भविष्योत्तर पुराणाला अनुसरून असावे. तेथील श्लोक असा:—नवम्यां शुक्लपक्षस्य कार्तिके निरगात्कृतं। त्रेता सिततृतीयायां वैशाखे समपद्यत ॥ दर्शेतु माघेमासस्य प्रवृत्तं द्वापरंयुगं। कलिःकृष्णत्रयोदश्यां नभस्ये मासि निर्गतः ॥ विष्णुपुराण व भविष्य पुराण ह्यांत विरोध मानण्याचें कारण नाही; कल्पभेदानुसार व्यवस्था लावावी हें टीकाकारांचें समर्थन हास्यास्पद आहे. कल्पोत्तर काळीं युगानुक्रम बदलत नसतो. माझ्या मतें भविष्योत्तर पुराणकाराचा अभिप्राय चुकीचा आहे. कृतयुगादीला बाजूस सारून त्रेतादीला इतकें महत्त्व कोणीहि देणार नाही. ज्या युगांत धर्म लंगडा असतो त्या युगाचें दान अक्षय्य फल देतें आणि कृतयुगांत चारी पायांवर उभा असलेला धर्म क्षीणपुण्य होतो असें मानणें मूर्खपणाचें समजलें पाहिजे. सर्व युगादि दिनीं दिलेलें दान व केलेलें कर्म अक्षय्य होतें असें शास्त्र सांगत नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वसंताचा दुसरा महिना व आगामी ग्रीष्म ऋतु ह्यास्तव उदकुंभ, छत्री, जोडा ह्यांचे दान करावें म्हणून धर्मशास्त्रकार सांगतात तें उचितच आहे.

अक्षय तृतीयेला जनार्दनाने ब्रह्मलोकांतून गंगानदी पृथ्वीवर आणली, यव उत्पन्न केलें आणि कृतयुगाला आरंभ केला (यवानुत्पादयामास युगंचारब्ध वान् कृतं) असें ब्रह्मपुराणकार सांगतात म्हणूनच ह्या दिवशीं यव देण्याची वहिवाट आहे. यवधान्य हिंदुस्थानांतलेंच दिसतें.

वर सांगितल्याप्रमाणें ह्या दिवसाच्या कर्माच्या तीन देवता आहेत. देव, पितर आणि बसंतमाधव. प्रत्येक देवता स्वतंत्र आहे.

युगादीनिमित्ताने पितरांना उद्देशून श्राद्ध करावें लागतें. युगनिर्मिति देवांची म्हणून हवन, जप, गोभूमिदान इत्यादि; कालारंभ वसंत ऋतूंत म्हणून उदकुंभ वगैरे.

अक्षय्यतृतीयेला परशुरामाचा जन्म झाला अशा समजुतीने ह्या दिवशीं परशुराम जयंती साजरी केली जाते. परशुराम हा त्रेता युगांतील अशी दंतकथा आहे. त्रेतायुगांत चैत्र वैशाख हीं महिन्यांचीं चन्द्रावरून पडलेलीं नांवें प्रचारांत होतीं ह्याला आधार काय ? वैशाखस्य सिते पक्षे तृतीयायां पुनर्वसौ निशायाः प्रथमे या मे रामाख्यः समभूद्धरिः ह्या वचनांतील जन्म दिवस काल्पनिक असावा. वरील वाक्यांत त्रेतायुगाचा उल्लेख नाही. देवीभागवतांत १९ व्या त्रेतायुगांत परशुराम जन्मल्याचें कथन आहे तर आदि पर्वांत त्रेता व द्वापार ह्यांच्या संधिकालांत जन्म झाल्याचें वर्णन आहे. ह्यावरून दंतकथा अबाधित राहिली नाही हें स्पष्ट होतें. परशुरामाला अर्घ्य देतांना म्हणावयाचा मंत्र येणें प्रमाणें:—जमदग्निसुतो वीर क्षत्रियांतकरप्रभो गृहाणार्घ्यं मया दत्तं कृपया परमेश्वर.

हा लेख धर्मसिंधु स्मृतिकौस्तुभ, भारतीय प्राचीन चरित्रकोश, ज्योतिषशास्त्र ज्ञानकोश इ. ग्रंथांच्या आधारें लिहिला आहे.

हा निघे पदाती

ना. मा. सरपटवार

★

हा निघे पदाती शस्त्र अहिंसा हातीं
चालता, बोलता देव मागतो माती !
ही अर्थविषमता म्हणजे विश्वअनर्थ
टाळाया आता मार्ग सोडणें स्वार्थ !
ही खरी संस्कृती, हाच खरा युगधर्म
आचार्य कृतींतिल कुणा न कळतें मर्म !
व्हा जागे,सावध सारे उघडा डोळे
अनुसरा 'प्रकाशा' करील मग तम काळे !!

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेशांतील पहिलेंच उत्खनन—

त्रिपुरीच्या प्राचीन इतिहासावर नवा प्रकाश

[जबलपूर येथील वि. सा. सम्मेलनाच्या १४ व्या अधिवेशनाबरोबर ता. ३ मे १९५२ रोजीं भरलेल्या सांस्कृतिक प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना सागर विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाचे प्रमुख डॉ. मो. गं. दीक्षित यांनी केलेल्या भाषणाचा महत्त्वाचा भाग खाली दिला आहे.]

नांव प्रौढ पण स्वरूप संकुचित

" कांही वर्षांपूर्वी इतिहासाची आपल्या देशांत काय किंवा इतरत्रहि एकंदर कल्पनाच मोठी संकुचित होती. सार्वभौम राजांचीं नांवें, त्यांच्या जन्ममृत्यूंची व कारकीर्दींची नोंद करणें, त्यांचे इतर मांडलिक राजांशीं झालेले समरप्रसंग ह्यांची जंत्री करणें ह्यांतच सर्व इतिहास सामावलेला आहे, अशी लोकाची समजूत होती. वेगवेगळ्या कालखंडांतून राजकीय, आर्थिक, धार्मिक व सामाजिक परिस्थिति कशी बदलत गेली व त्यामुळे साध्यासुध्या नागरिकांच्या जीवनावर कोणता परिणाम झाला, ह्याची दखल 'इति+ह+आस' असें प्रौढ नांव धारण केलेल्या इतिहास-ग्रंथांतून बहुधा घेतलेली नसे.

इतिहासाभ्यासांतील मोठी उणीव

आपला सांस्कृतिक दर्जा कोणता होता, तो कोणकोणत्या अवस्थांतून परिणत होत गेला, ह्याचें सम्यक्‌ज्ञान आपणांस करून घ्यावयाचें असेल; तर वेगवेगळ्या काळांतील नागरिकांची रहाणी कशी होती, ते कोणत्या प्रकारच्या घरांतून रहात असत, तें काय खातपीत असत, ते कोणत्या प्रकारचे अलंकार घालीत असत, त्यांच्या वापरांत कोणत्या प्रकारचीं आयुधें-हत्यारें येत असत, त्यांचीं वस्त्रें-प्रावरणें कशीं होतीं, त्यांचा उद्योगधंदा काय होता व या सर्व बाबतींत ते इतरांपेक्षां किती पुढारलेले वा मागासलेले होते, ह्या सर्व गोष्टींचे ज्ञान आपणांस यथार्थतेने झालें, तरच त्या त्या काळाचा इतिहास आपणांस पुरेतेपणें समजला, असें निश्चयात्मक सांगतां येईल. किंबहुना, वस्तुनिष्ठ संस्कृतीचा अभ्यास हें इतिहासाचें–विशेषतः प्राचीन इतिहासाचें–एक मूलभूत अंग आहे, अशी कल्पनाच मुळी अगदी अलीकडल्या काळापर्यंत देखील सर्वसाधारण इतिहासाभ्यासकांचे ध्यानांत आलेली दिसत नाही. ऐहिक गोष्टींकडे तुच्छतेने पहाणें व पारमार्थिक विचारांवर भर देणें, हें आपल्या भारतीय संस्कृतीचें फार प्राचीन काळापासून एक वैशिष्ट्य समजलें जात असल्यामुळेहि कदाचित्, ज्याला पूर्वी 'शास्त्र' अशी संज्ञा होती, अशा इतिहासाच्या ह्या दृष्टिकोनाकडे आपली उपेक्षा नेणतेपणाने झाली असेल. परंतु, आता मात्र अशी वेळ येऊन ठेपली आहे कीं, आपल्या भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतरांस पटवून द्यावयाचें असेल, तर इतर गोष्टींबरोबर वस्तुनिष्ठ ज्ञानावरहि भर देऊन आपल्या इतिहासाभ्यासांतील ही मोठी उणीव आपण भरुन काढली पाहिजे.

जबलपूरच्या परिसरांतील अवशेष

इतिहासपूर्व कालापासून तों थेट अर्वाचीन कालापर्यंत मध्यप्रदेशाच्या इतिहासांत किती मोठमोठे खंड पडले आहेत, ते पाहा. संघाचें हें अधिवेशन ज्या जबलपूर शहरांत–प्राचीन 'जौलीपट्टण'–भरविलें जात आहे, त्याच्या आजूबाजूने जरा चौफेर नजर टाका. येथून जवळच होशंगाबादपाशी दगडाच्या एका कपारींत जिराफ आदि पशूंचीं चित्रें गेरुने काढलेलीं आढळतात. ज्या इतिहासपूर्व मानवाने हीं चित्रें काढलीं, तो कोठून इकडे आला? त्याला ह्या प्राण्याचा परिचय कसा झाला? पचमढीस वेगवेगळ्या गुहांतून आढळणारी रंगीत चित्रें कोणीं काढलीं? चांद्याजवळ पिंपळगांव येथील इतिहासपूर्वकालीन अजस्र दगडी शवपेटिका कोणीं करविल्या? सिरगुजा संस्थानांत नाट्यकलेसाठीं डोंगरांत रंगभूमीचा थाट कोणीं करविला? मौर्यकाळांत तेथून ३० मैलांवर रूपनाथ येथे सम्राट अशोकास आपलें शिलाशासन कोरुन ठेवण्याची आवश्यकता कां भासली? तेथून १० मैलांवर बघोडा येथे वासिष्ठिपुत्राचा शिलालेख कसा आला? नर्मदा नदीचें धर्मिक व सांस्कृतिक माहात्म्य कां वाढलें? कुषाण राजाचें ह्या प्रदेशावर खरोखरच स्वामित्व होतें काय? त्रिपुरी येथे स्वतंत्र गणराज्य कोणत्या कारणामुळे संस्थापित झालें होतें? प्राचीन इतिहासांत मूलगामी अशा वर सांगितलेल्या कांहीं प्रश्नांची छाननी केली, तर आपणास असें आढळून येईल कीं, ह्या बाबतींत आपण अजून अंधकारांतच आहोत व निश्चयात्मक स्वरूपांत ह्या प्रश्नांचें उत्तर आज आपणांस देतां येत नाही.

न उलगडलेले अनेक प्रश्न

ही फार पूर्वीची गोष्ट म्हणून जरी बाजूला ठेवली, तरी मध्ययुगीन काळांतील ऐतिहासिक अवशेषांचें आपलें अज्ञानहि असेंच विस्मय वाटण्यासारखें आहे. ज्या वाकाटक सम्राटांचें साम्राज्य सर्व विदर्भभर पसरलेलें होतें, त्यांच्या सार्वभौमत्वाचें निदर्शक असें एकहि नाणें आपल्याजवळ नाही. त्यांच्या राजधान्यांविषयी म. म. प्रा. मिराशी यांनी परिश्रमपूर्वक केलेलें संशोधन मान्य होण्यासारखें असलें, तरी नांदिवर्धन, पवनार इत्यादि स्थळीं उत्खनन करुन, हा वाकाटक सम्राट् प्रवरसेनाचा प्रासाद, ही त्याच्या सैन्याच्या छावणीची जागा असा निर्णय अद्याप लागावयाचा आहे. ज्या कलचुरी घराण्याच्या ज्वलंत इतिहासाने जबलपूरच्या आसपासचा प्रदेश एके काळीं जागृत होता, त्या कलचुरी घराण्याची त्याच्या ताम्र-शिलाशासनांतून अभिप्रेत असलेल्या माहितीव्यतिरिक्त आणखी माहिती आपणास फारशी उपलब्ध आहे, असें निश्चयात्मक सांगतां येणार नाही. त्यांच्या शकाच्या निर्णयाबद्दल म. म. प्रा. मिराशी ह्यांना किती परिश्रम करावे लागले, ह्याची आपणा सर्वांना कल्पना आहेच. कलचुरी कालांतील शैकड्यांनी मोजतां येतील, असे कितीतरी अवशेष मध्यप्रदेशांतील प्रत्येक खेड्यांत खेरमाईचे आसपास लोकांनी अजाणतेपणें आणून टाकलेले आपणांस आढळतील. ह्या सर्वांविषयी सूक्ष्म संशोधन अजूनपावेतो व्हावयाचें आहे. भेडाघाटच्या चौसष्ठ योगिनींच्या देवळाविषयी पुष्कळशी माहिती अजून अंधकारांतच आहे. त्रिपुरीचा गोलकी मठ कोठे आहे?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कलचुरी काळांत कलेचा प्रसार जास्त कां झाला ?–हे व असे अनेक महत्वाचे प्रश्न आपल्या इतिहासाच्या प्रांगणांत विहार करणाऱ्यांना वारंवार भेडसावतील.

झालेल्या संशोधनाचा निर्देश

याचा अर्थ नव्हे कीं, मध्यप्रदेशाच्या इतिहासासाठीं अद्याप कांहीच प्रयत्न झालेले नाहीत. सरकारी पुराणवस्तुसंशोधन खातें व खाजगी प्रयत्न यांच्यामुळे ह्या कामाचा व्याप प्रतिवर्षी सारखा वाढतच गेला आहे."

यानंतर सरकारी पुराण वस्तु संशोधन खातें, यवतमाळचा शारदाश्रम, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, हिरालाल पुरातत्व समिति, सागर विद्यापीठ इ० संस्था आणि सर अलेक्झांडर कनिंगहॅम, कै. डॉ. हिरालाल, मि. कझेन्स, श्री. राखलदास बॅनर्जी, म. म. प्रि० मिराशी, श्री. ब्यौहार राजेन्द्र सिंह, डॉ. संतलाल कटारे, डॉ. य. खु. देशपांडे, कै नी. ब. भवाळकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. ह. ना. नेने, श्री. वा. ना. देशपांडे, कै. यादव माधव काळे आदि प्रभृतींच्या परिश्रमांचा उल्लेख करून, डॉ. दीक्षित पुढे म्हणाले,

ह्या दृष्टीने आपल्या प्रांतिक सरकारने सागर विद्यापीठास त्रिपुरी येथील उत्खननासाठी दिलेली वीस हजार रुपयांची आर्थिक मदत मला विशेष उल्लेखनीय वाटते. सागर विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ. रामप्रसाद त्रिपाठी ह्यांच्या प्रोत्साहनाने चार महिन्यांपूर्वी मी जेव्हा हें उत्खनन सुरू केलें, तेव्हा ह्या प्रांताच्या इतिहासाशीं निगडित असे तीन मूलभूत प्रश्न माझ्यापुढे उभे होते. ते असे:—

(१) त्रिपुरीच्या इसवीसनापूर्वी तिसऱ्या शतकापासून तो कलचुरींच्या अभ्युदयापर्यंतच्या काळांतील ऐतिहासिक वस्तु खणून काढून शोधणें.

त्रिपुरीस मौर्यकाळाचे सुमारास एक मोठें स्वतंत्र गणराज्य स्थापिलें गेलें होतें, असा पुरावा तेथे सांपडणाऱ्या "तिपुरी" हें नांव असलेल्या तांब्याचे नाण्यावरून मिळालेला होता. त्यानंतर एकदम आठव्या शतकाचे शेवटीं त्रिपुरी हें परिव्राजक व कलचुरी घराण्यांची राजधानी म्हणून इतिहासांत नजरेसमोर येतें. परंतु मध्यंतरीच्या अकराशे वर्षांच्या काळांतील कोणताच इतिहास आपणास माहित नव्हता. तेथें सांपडणाऱ्या जुन्या नाण्यांवरून वगैरे कांही अंदाज बांधतां येण्यासारखे होते. परंतु प्रत्यक्ष खणून सहाय्याने ह्या सिद्धांतास भक्कमपणा आणणें हें माझ्या उत्खननाचें पहिलें साध्य होतें.

(२) माझ्या पुढचा दुसरा प्रश्न असा होता कीं, ताम्रपट, शिलालेख, तत्कालीन वाङ्मय इत्यादींतून त्रिपुरी ही कलचुरींची एक राजधानी म्हणून उल्लेखिलेली असली व प्रत्यक्ष तेवर येथे सांपडणाऱ्या मध्ययुगीन अवशेषांवरून तिला दुजोरा मिळत असला, तरी प्रत्यक्ष राजधानीचे अवशेष हे अमके असें नीटपणें दाखवितां येण्यासारखें संशोधन झालेलें नव्हतें. तेव्हा तेथेच सुमारें पांच मैलाच्या परिसरांत हिंडून हें राजधानीचें स्थळ असा निर्णायक पुरावा मिळवायाचा होता. ह्या वर्षीच्या माझ्या संशोधनांत हें स्थळ कोणतें हें ठरविता आलें, तरी येत्या दिवाळीनंतर तेथील उत्खनन पुन्हा सुरू होईल, त्याच वेळीं ह्याविषयी अधिक निश्चयात्मक असें सांगतां येणें शक्य होईल.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(३) ह्याशिवाय सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा तिसरा प्रश्न माझ्यासमोर होता तो असा—नर्मदा नदी ही फार पुरातन काळापासून, उत्तर व दक्षिण हिंदुस्थान यांच्या मध्यरेषेवर असल्यामुळे, फार महत्व पावलेली नदी होय. साधारणतः आपल्या नजरेस असें येतें कीं, उत्तर हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांचा नर्मदेच्या पलिकडील प्रदेशांत चिरस्थायी असा शिरकाव झालेला नव्हता थोडीशी अपवादात्मक उदाहरणें सोडून दिलीं तर त्यांच्या स्वाऱ्या किंवा दिग्विजय बहुधा नर्मदेच्या उत्तरेसच थांबलेले दिसतात. जी गोष्ट उत्तरेकडील राजांची तीच गत दाक्षिणात्य सार्वभौम म्हणविणाऱ्या राज्यकर्त्यांची असे. भौगोलिक परिस्थिति, साधनांची अननुकूलता इत्यादि अनेक कारणांमुळे नर्मदा नदी हीच दाक्षिणात्य व उत्तरेकडील संस्कृतींची परिसीमा असें मानण्यांत येई व अजून क्वचित् येतेहि. ह्या दोन संस्कृतींतील फरक सूक्ष्माध्ययन करणाऱ्यांच्या नजरेस अद्यापिहि चटकन भरतो. नर्मदेच्या कांठच्या संस्कृतींचा अभ्यास करून, ह्या संस्कृति पूर्वीपासूनच वेगवेगळ्या गटाने अलग अलग राहिल्या की कालाच्या ओघांत दोन्ही संस्कृतींची कोठे तरी सरमिसळ होऊन नर्मदा नदी ही त्या संस्कृतींची परिरेखा न ठरतां, त्याचे परस्पर-मीलनास कारणीभूत होणारी संस्कृति-सोपान बनली, हें शोधणें हाहि एक हेतु त्रिपुरी हें उत्खननाचें स्थळ निवडण्यांत होता.

त्रिपुरीसारख्या राजधानीच्या किंवा जेथे नेहमीच संस्कृति-संगम व्हावयाचा अशा एकाच महत्त्वाच्या स्थळीं उत्खनन करून ह्या विषयीचे सिद्धांत बांधणें जरा धाडसाचें आहे, हें मला मान्य आहे. तथापि, हातीं आलेल्या दृश्य पुराव्यावरून जेवढें सांगतां येण्यासारखें आहे तेवढें येथे सांगतों.

पांच वेगवेगळ्या कालखंडांतील थर

त्रिपुरीच्या उत्खननांत ढोबळ रीतीने पांच वेगवेगळ्या कालखंडांतील थर आमच्या नजरेस आले त्यापैकीं सर्वांत खालच्या व जुन्या थरांत इतिहासपूर्वकालीन मानवाने बनविलेली अकीक गारगोटी, चर्ट इत्यादि नर्मदेंत सांपडणाऱ्या दगडां-पासून तयार केलेली लहानसहान धारेचीं हत्यारें सांपडलीं. त्यांचे कांही नमुने आजच्या प्रदर्शनांत ठेवलेले आहेत. हीं हत्यारें शिकार केलेल्या प्राण्यांची कातडी सोलणें, झाडाच्या साली काढणें, लहान सहान वस्तु करवतून काढणें इत्यादि कामा-साठीं व धातूंचा उपयोग माहित होण्यापूर्वी करविलेलीं आहेत. ह्या हत्यारांचा काल खिस्तपूर्व कितीतरी शतकें इतका दूरचा आहे.

वसाहत केव्हा झाली?

ह्या नंतरच्या काळांत त्रिपुरी जवळून वाहणाऱ्या बाणगंगा नदीच्या एखाद दुसऱ्या लहानशा पुराव्यातिरिक्त तेथे मानवी वसाहतींचीं चिन्हें पुष्कळ काळपर्यंत नव्हतीं. खिस्तपूर्व चवथ्या शतकांत मात्र तेथें केवळ मातीनेच बांधलेलीं घरें वगैरे बनवून त्रिपुरीच्या पहिल्या इतिहासकालीन वसाहतीस सुरुवात झाली. ह्या काळांत, प्रदर्शनांत, आपणास अतिशय गुळगुळीत व चकाकी आणलेल्या काळ्या खापऱ्या दिसतात, तशा तऱ्हेचीं भांडीं वापरण्याची पद्धत फार प्रचलित होती. आपापसांतील व्यवहार, दूरवरच्या प्रदेशांत दळणवळण इत्यादि बाबतींत हीं भांडीं वापरणारे लोक बरेच पुढारलेले होते, असें दिसतें. तेथे सांपडलेल्या थरांच्या एकंदर जाडीवरून ही वसाहत तेथे बरांच वर्षें टिकून होती, असें अनुमान करण्यास जागा आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्या वसाहतीच्या मोडक्या तोडक्या भग्नावशेषांवर ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांत त्रिपुरीच्या गणराज्यांची स्थापना झाली; व ह्या काळ तेथील लोकांनी वापरलेल्या वस्तूंच्या मूल्यमापनावरून बराच भरभराटीचा व समृद्ध असा दिसतो. ह्या काळांतील लोकांचीं घरें, पाया व जोते ह्यांच्यासाठीं भक्कम दगडांचा उपयोग करून त्यावर मातीच्या भिंती अशा पद्धतीचीं होतीं. त्या लोकांना धातूंचा उपयोग माहीत झाला असून ते त्रिपुरी गणराज्याचें नांव असलेलीं नाणीं पाडीत असत. ते स्वतंत्र व कोणत्याहि परकीय अमलाखालीं आलेले नव्हते. नानाविध पैलूदार मणी, अलंकार, आभूषणें इत्यादींनी ते आपलीं शरीरें भूषवीत होते आजच्या प्रदर्शनांतील बहुतेक सर्व सुंदर मणी ह्याच काळांतले आहेत. नानाविध प्रकारचीं मातीचीं भांडीं, त्यांचे आकार वगैरेवरून त्या लोकांचें जीवन थोडेंफार विलासी असावेंसें वाटतें.

उपलब्ध अवशेषांवरून निघणारीं अनुमानें

त्रिपुरीच्या गणराज्यानंतर व थोड्या पूर्वीहि येथे प्रचलित असलेल्या आहत-मुद्रा (Punch marked coins) आम्हास उत्खननांत सांपडल्या. उत्खननांतील ह्या काळाच्या थरांत सांपडलेल्या पुष्कळशा वस्तूंचे व मृत्तिकापात्रांचे उत्तर हिंदुस्थानांतील तत्कालीन वस्तूंशी इतकें साम्य आहे कीं, त्या वेळच्या लोकांची संस्कृति सर्वस्वी उत्तरेचा वळणाची होती, असें अनुमान करण्यावांचून राहवत नाहीं.

सुमारें एक दोन शतकांनंतर ही परिस्थिति पालटली. त्रिपुरीवर शक-शातवाहनांचें राज्य सुरू झालें. मौर्य कालानंतरच्या थरांत ह्या घराण्यांतील जो सुप्रसिद्ध राजा शातकर्णी याचें इ. स. पूर्वी पहिल्या शतकांतील एक नाणें व ह्या काळांतील ब्राह्मी लिपींतील लेख कोरलेलें एक मातीचें भांडेंहि मिळालें.

शातवाहनांच्या काळांत त्रिपुरीस बौद्ध धर्माचा शिरकाव झाला; व ह्या धर्मीयांचे दोन मठ, त्या सभोवतालचें पांगण व त्यांत खोदलेली एक विहीर पण उत्खननांत सांपडली. शिशाचीं नाणीं, मातीचे साचेमुखे अलंकार, दगडी करंडक, काचेच्या वस्तु, मृण्मय मूर्ति अशा अनेकविध वस्तु आम्हांस ह्या थरांत सांपडल्या. ह्या वस्तूंमध्ये उत्तरीय व दाक्षिणात्य अशा दोन्ही संस्कृतींचा ठसा असल्याने ह्या काळांत ह्या दोन्ही संस्कृतींचा संगम त्रिपुरीस प्रथम झाला असावा, असें मानण्यास पुष्कळच जागा आहे.

शातवाहनोत्तर काळामध्ये तेथील बौद्ध धर्माची पकड हळूहळू नाहीशी झाली. कारण ह्यानंतरच्या कालखंडाचे जे अवशेष आम्हांस सांपडले, त्यांतून युद्धोपयोगी अशीं पुष्कळच लोखंडी आयुधें होतीं. हा काळ इ. सनाच्या चवथ्या शतकाच्यां सुमाराचा असावा.

मध्यंतरीं कोणतीच वसाहत झाली नव्हती

आम्हांस उत्खननाच्या जागीं ह्या काळानंतरचे कोणतेच अवशेष मिळाले नाहीत. ह्या काळांत उभारलेल्या पुष्कळ घरांचे पायेच फक्त आम्हांस सापडले. त्यावरून तेथील इमारतींचा कोणीतरी मुद्दाम नाश केला असावा किंवा तेथील घरांच्या विटा काढून नेल्या असाव्यात, असा तर्क आहे. आमच्या उत्खननाच्या मुख्य जागेपासून सुमारें ३०-४० यार्डांवरच कलचुरींच्या काळांत उभारलेले पण आता अगदी भग्नावस्थेंत असलेलें एक मोठें गोलाकार देऊळहि आम्हांस तेथील

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जगल साफ करतांना आढळलें. त्या देवळाच्या पायासाठी जो भराव घातला होता, त्यांत वर सांगितलेल्या घरांच्या दगडी विटांचा उपयोग केलेला आढळला. त्यावरून कलचुरींच्या कालापर्यंत मध्यंतरीच्या काळांत उत्खनन झालें त्या विवाक्षित स्थळीं तरी कोणतीच वसाहत झाली नव्हती, असेंहि लक्षांत आलें.

उत्खननाचें ओझरतें समालोचन

उत्खननांत सांपडलेल्या सर्व वस्तु किंवा त्याविषयीं विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि, मध्यप्रदेशांतलि पहिलेंच उत्खनन असल्यामुळे व त्याविषयी आपणा सर्वांस कुतूहल साहजिकच असणार म्हणून त्याविषयी थोडकीशी माहिती व त्या उत्खननापासून ज्ञात झालेला इतिहास याची ओझरती कल्पना मीं आपणांस वि. सा. संघाच्या चिटणीसांच्या आग्रहावरून दिली.

वस्तुनिष्ठ संस्कृतीचा अभ्यास

आपल्या वार्षिक अधिवेशनाच्या प्रसंगीं सांस्कृतिक प्रदर्शन भरवून, वस्तुनिष्ठ संस्कृतीच्या अभ्यासाचा प्रचार व प्रसार करणें हें एक महत्वाचें कार्य विदर्भ साहित्य संघ करीत आहे. त्याला आपल्या सारख्या रसिकांची वारंवार अशीच मदत मिळत असावी, अशी प्रार्थना करून व आपल्या सर्वांचे पुन्हा एकदा आभार मानून मी माझें भाषण पुरें करतों.

कुविचाराला बढती मिळते!

प्र. रा. देशपांडे

★

कळकटलेली मिणमिण पणती
अन्धाराला नाक मुरडते!
अशाश्वताच्या दोल्यावरती
निर्घृण नियती स्वैर हुदडते!
निबिड अमेच्या हृदीं सळसळे
वैफल्याचा क्रूर कालिया!
निष्प्रेमाचीं कठोर मुसळें
स्वैर ठेंचतीं कवळा चिलिया!
विराट ध्येयें मनांत अमुच्या
छाद्मिपणाने दैव हांसतें!
कुळबुडव्या अन् दशाननाची—
दुर्दैवाला संगत मिळते!!
अशाश्वताचें शाश्वत ताण्डव
नियतीचीं अन् भेसुर गीतें
माङगल्याच्या वांझ कल्पना
कुविचाराला बढती मिळते!!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशा ह्या समस्या !

वामन जोशी

★

उठे निनादून सारें आसमंत
दिशादिशांतुन भरला आवाज
"डोळे उघडून पहा क्षणभर
दिसेल आणि जीवन-प्रवाह
वाहत अखंड तिन्ही- त्रिकाळ
थकवा नाहीच काळसागराच्या
रोखाने दिशेने आणिक पहा
अनेक भोवरे अति भयंकर !
जीवनीं तशा कठिण समस्या !
प्रकार विविध जितक्या प्रकृति
भोवति चेहरे सदा प्रश्नांकित !
घडपड व्यर्थ सोडविण्यासाठी
आटोकाट यत्नें शिकस्त करून
शब्दकोड्यापरी ! " ॥१॥

तत्त्वज्ञ महान आपुल्या तालांत
अगाध ज्ञानांत चूर सर्वकाळ
पाहुनिया डोळां संघर्ष चालला
जोरांत, जोमांत चिंताक्रांत होई
"काय खुळे लोक ? नाही कां या ठावें ?
जगच्चालकाचीं अवघीं लेकरें !
समान दर्जाचीं सारख्या रक्ताचीं
हाडमांस तेंच प्राण सारखाच
भांडति कशास शस्त्रें परजून ?
उमजेल केव्हा आपली चूक
आणिक तयांना जाणिव होईल
जीवनधर्माची ? " ॥२॥

ढोल बडवीत विश्वशांततेचा
मुत्सद्दी कुशल साम्राज्यवादी
दंड थोपटून आव्हान युद्धास
करीत, कारण प्रश्न सतावीत
त्यास, रात्रंदिन अस्वस्थचित्त
"कोणत्या प्रकारें नांदेल शांतता
अखिल जगतीं ? " ॥३॥

आणि हा लेखकु दंग सदोदित
स्वप्नांच्या राज्यांत दिवस वा रात
कांही लघुकथा लिहुनिया धाडी
संपादकाकडे मासिकीं छापण्या
साभार परत बहुतेक येई
प्रश्न यास पडे "साधाया लौकिक
आणि संपत्ती उपाय कोणता
रामबाण असा ? " ॥४॥

लावुनिया डोळे कविमहाशय
चंद्राचें चांदणें तारका पाहत
उषा आणि संध्या भर दुपारीं !
रमणीचें हास्य चुंबन गुलाबि
दृढ आलिंगन लगेच क्षणांत
ऊन उसासे आंसवें नेत्रीं
काढुनी दावी गारुड्यापरी
पोतडींतून थोड्या अवधींत
समस्या याची अहर्निश राहे
"नामांकित कवि होण्याकरिता
उपाय कोणता ? " ॥५॥

रस्त्यारस्त्यांतून जाहीरपणें
रडगाणें गाई प्रेमाचें आपुल्या
प्रेमवेडा कोणी जखम जहाली
नुकतीच याला अजून ओली
हृदयांत खोल चाकुसुरीवीण !
प्रश्न असे सदा डोळ्यासमोर
"भेटेल कधी केव्हा आणि कोठे
आपुली प्रिया ? " ॥६॥

काळजी लागे आणिक मजला
आपुल्या पोटाची दीन कारकून
बहुतेक जाई वेळ कचेरींत
थकुनिया येतां आराम करी !
फिरणें कुठलें ? कुठला व्यायाम
त्यामुळे पचन लवहि न होई !
प्रश्न माझ्यापुढे उभा अहोरात्र
"पुरुनी उरलों एरंडेलासहि !
आहे का कोणता एखादा उपाय
आपुलें पोट साफ ठेवण्याचा
जिवंत राहण्या ? " ॥७॥

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समीक्षा

गडकऱ्यांचें अंतरंग*

★

गडकऱ्यांची हृदयावीणा भंगलेली होती. या भंगलेल्या वीणेंतून 'जित्य जिवाच्या जातिवंत करुणा'नं त्यांनी जे सूर आळविले त्यांनी मराठींतील अमर अशा प्रेमगीतांचं स्वरूप धारण केलं. तरल कल्पकता लाभूनहि गडकऱ्यांचीं प्रेमगीतं-निराश प्रेमगीतं-मराठींत अमर झालीं याचं कारण त्यांच्या उत्कट भावनाविष्कारांत आहे. गडकऱ्यांचा पिंड खऱ्याखुऱ्या भावकवीचा होता. कल्पकतेच्या मोहक पण कागदी फुलांवरुन त्यांच्या प्रेमगीतांतील काव्यसौंदर्याचं मूल्यमापन कांही टीकाकर करतात. पण अलंकारांवरुन व्यक्तीच्या सौंदर्याची समीक्षा करणं कितपत न्यायाचं होईल ?—

कुठलाहि भावकवि हा आत्मपूजक असतो. आपल्या अहंकारी व्यक्तित्वाचा आविष्कारच तो आपल्या भावगीतांतून करीत असतो. गडकऱ्यांनीहि तो केला; आपल्या प्रेमगीतांतून केला आणि आत्यंतिकतेनं केला. अतिरिक्त भावनावशता हें कलावंताच्या निकोप आणि निरोगी दृष्टिकोनाचं लक्षण नाही हें मला मान्य आहे. पण ही आत्यंतिकता अजमावण्याचं प्रमाण जोपर्यंत अस्तित्वांत येत नाही व त्या आत्यंतिकतेंत रसिकांचीं अंतःकरणं क्षणकाल का होईना पण भावनांच्या गंगाजळांत बुडवून काढण्याचं सामर्थ्य जोपर्यंत आहे, तोपर्यंत तिचा बाऊ करण्यांत काय अर्थ ! भवभूतीच्या 'उत्तररामचरितां'त किंवा जेन ऑस्टिन्, चार्लस् डिकन्स किंवा हार्डी यांच्या कादंबऱ्यांत असा आत्यंतिक भावनाविष्कार आढळतो. पण त्यामुळे त्यांची परिणामक्षमता मंदावली आहे असें म्हणतां येईल का !—

गडकऱ्यांच्या प्रेमगीतांत आत्मनिवेदनापेक्षा (Self-communication) आत्मदर्शन (Self-expression) अधिक आहे. आत्मदर्शनांत हृदयाचा सगळा खळखळाट, भावनेची सारी उचंबळ आणि आत्यंतिक आत्मनिष्ठेतली सारी गढूळता व्यक्त झालेली असते. त्यांत प्रीतीचे झरे असतात, भावनांच्या डोंगरलाटा असतात आणि विकारांचे ज्वालामुखीहि असतात. कलेचा उगम व्यक्तिगत भावनांत असला व 'नदीमुखेनैव समुद्रमाविशत्' या कालिदासोक्तिप्रमाणे तिची परिणति सामाजिक भावनेंत होत असली, तरी आत्मदर्शन घडविणाऱ्या स्वयंकेंद्रित लेखकाला समाजाची फिकीर नसते असंच म्हटलं पाहिजे. अहंकारी व्यक्तित्ववादांतूनच त्याचं वाङ्मय उत्स्फूर्त झालेलं असतं. "Art is a means of socialising the feelings" या टॉलस्टॉयच्या व्याख्येपेक्षा "The excellence of every art is its intensity" ही कीटस्ची व्याख्याच त्याच्या वाङ्मयाला अधिक यथार्थपणें लागू शकते. व्यक्तिमत्व (Personality) नव्हे, तर व्यक्तित्व (Individuality) हेंच त्याच्या वाङ्मयाचं अधिष्ठान.

गडकऱ्यांचंहि वाङ्मय असंच आहे. त्यांच्या भावनाशील नाटकांत (Sentimental Dramas) व विशेषतः त्यांच्या प्रेमगीतांत 'आत्मीय अलिप्तता'

*ले.—प्रा. रा. शं. वाळिंबे एम्. ए; चित्रशाळा प्रकाशन, पुणें २; मूल्य ५ रुपये.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुळीच नाही. त्यामुळेच प्रा. वाळिंबे यांनी गडकऱ्यांच्या वाङ्मयावरून त्यांच्या भावजीवनाचा चित्रपट काढण्याचा प्रस्तुत प्रबंधांत प्रयत्न केला आहे. वाङ्मयाच्या आस्वादाला मूळ लेखकाचं चरित्र कितपत कारणीभूत होतं हा प्रश्न वेगळा. एवढं खरं की त्यामुळे आत्मनिष्ठ कवीच्या काव्यांत उत्कटपणें प्रतिबिंबित होणाऱ्या भावना त्याच्या स्वतःच्या कीं दुसऱ्याच्या हें कळून येतं, पण काव्याच्या रसास्वादाला हें कळून येण्याची काय आवश्यकता आहे ?

कालिदासाचं भावजीवन कसं होतं किंवा शेक्सपीअरनं आपलीं सुनीतं कुणाला उद्देशून लिहिलीं आहेत हें कळल्यावर का त्यांच्या वाङ्मयापासून आपणांस आनंद होतो ? काव्याच्या रसास्वादाला मूळ सत्याच्या नेणिवेनं कसलाहि बाध येत नाही. किंबहुना, मूळ सत्यापेक्षांहि हृदयंगम सत्याभासच काव्यानंदाला अधिक कारणीभूत होतो असं मला वाटतं.

पण हें झालं रसिकाच्या भूमिकेवरून. टीकाकाराची किंवा संशोधकाची भूमिका याहून वेगळी असते. काव्याच्या रसास्वादानंतर तो त्याचं विश्लेषण करतो. त्या विश्लेषणांतून मूळ कलावंताच्या अभिव्यक्त जीवनदर्शनाची त्याला अनुभूति येत असते. प्रस्तुत प्रबंधांत प्रा. वाळिंबे यांनी गडकऱ्यांच्या कवितांचें रसग्रहण करून त्यांच्या अनुषंगाने गडकऱ्यांच्या भावजीवनावर प्रकाश टाकला आहे.

गडकरी अत्यंत बुद्धिमान् होते, तितकेच भावनाप्रधानहि. त्यांच्या बुद्धिमत्तेचा आविष्कार कल्पनाप्रधान नाटकांत तर भावनेचा प्रकर्ष प्रेमगीतांत झालेला आपणांस दिसतो. मोहक कल्पनाचित्रें कशीं असतात याची कल्पना मराठी वाचकांना प्रथम गडकऱ्यांनी आणून दिली. 'एकच प्याल्यां'तील चवथ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशांतील सुधाकराचं किंवा 'राजसंन्यास' मधल्या शेवटल्या अंकांतील संभाजीचं प्रदीर्घ भाषण वाचून पाहिलं म्हणजे कल्पकतेतहि वाचकांना बेभान करण्याचं कसं सामर्थ्य असतं याचा प्रत्यय येईल. कल्पनेच्या नवनवीन उन्मेषांबरोबर वाचक वाहवत जातो, बेभान होतो. ललितवाङ्मयांत कल्पनेचं स्थान गौण आहे हें माहित असूनहि वाचकांना गडकऱ्यांचीं कल्पनाचित्रं हवींहवींशीं वाटतात यांतच त्यांच्या असामान्य कल्पकतेचं सामर्थ्य एकवटलेलं नाही का ? गडकऱ्यांचीं कल्पनाचित्रं हीं मराठी वाङ्मयांचीं भूषणं आहेत. 'मधुर सुगंधी स्वप्नें' आणि 'तरल कल्पनांचा तुरा' हीं प्रकरणं वाचकांनी या दृष्टीनं अवश्य पहावीं.

गडकऱ्यांनी रंगविलेलीं कल्पनाचित्रं (Images) मराठी वाङ्मयाचीं भूषणं आहेत असं जें मीं म्हटलं तें कित्येक टीकाकारांना आवडणार नाही. गडकरी मानवी स्वभावाच्या मुळाशी जात नाहीत. शेक्सपिअर जातो, कालिदासहि जातो. त्यांचीं पात्र आपल्या हृदयांत घर करून राहतात. याचं कारण त्यांच्या मुळाशी त्यांची व्यापक, चिंतनशील जीवनानुभूति आहे. गडकऱ्यांच्या पात्रांत प्रकाशपूजनाचा आकर्षकपणा आहे; दुःख चघळीत बसणारा निराशावादहि आहे. पण त्यामागील सखोलतेचा, विश्वात्मकतेचा साक्षात्कार मात्र नाही.

—पण आत्यंतिक व्यक्तित्ववादी लेखकाच्या वाङ्मयाला ही कसोटी कितपत लागू पडेल ? ती जर लागू पडत नसेल तर त्याचं वाङ्मय अगदी कवडीमोल समजायचं की काय ? मग त्या वाङ्मयानं क्षणकाल कां होईना, आपल्याला जे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बेभान करून सोडलेलं असतं त्याचं स्थान काय ? की, 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' हा शंकराचार्यांचा सिद्धांत वाङ्मयाच्या क्षेत्रांतहि लागू करावयाचा ? महाराष्ट्रांतल्या साहित्यशास्त्रज्ञांनी याचं अवश्य उत्तर द्यावं.

'प्रेम आणि मरण' या ११० पृष्ठांच्या प्रकरणांत प्रा. वाळिंबे यांनी गडकऱ्यांच्या प्रेमगीतांवरून त्यांना आलेल्या प्रेमाच्या अनुभवांचं संकलन केलं आहे. गडकऱ्यांना 'प्रेमाचे शाहीर' म्हणतात. शर्मिष्ठा नृत्याच्या एकेका चरणांतील पदविन्यासांतून प्रियकराविषयी साशंकता, आशोद्भव, उत्कंठा, आत्मसमर्पण वगैरे भावना ज्याप्रमाणे व्यक्त होत असतात त्याचप्रमाणे या शाहीराच्या प्रेमकवनांतून प्रेमाविषयीची दिव्यता (दिव्य प्रेमाची जाति), उत्कटता (ती कोण ?) अभिलाषा (जीवितास-), निराशा (अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस), आशोद्भव (प्रेमाखातर) इत्यादि विविध छटा व्यक्त झालेल्या आहेत. यामुळंच 'गडकऱ्यांनी एकोणिसावं प्रेमपुराणच जणु रचून ठेवलं.आहे' असं एका टीकाकारांनी म्हटलं होतं. गडकऱ्यांच्या प्रेमगीतांत इतक्या विविध छटा असूनहि त्या सर्वांच्या अंतरंगांतून त्यांच्या भग्न हृदयवीणेचाच सूर वाहतो यांत शंका नाही.

कांही कवितांच्या रसग्रहणाबाबत व त्यावरून प्रतीत होणाऱ्या गडकऱ्यांच्या अंतरंगाबाबत प्रा० वाळिंबे यांच्याशी माझा मतभेद आहे. एकच उदाहरण देतों. 'घुबडास' या कवितेंतून प्रा० वाळिंबे म्हणतात त्याप्रमाणे गडकऱ्यांचं निराशाग्रस्त हृदय मला तरी कुठं दिसत नाही. उलट घुबडाची एकापरीनं 'यस्यां जागर्ति संयमी' अशा मुनींशी तुलना करण्यांत व 'आमच्या दृष्टीचा रंग त्यावर कां लावायचा ?' अशी प्रास्ताविक टीप देण्यांत गडकऱ्यांचं वेगळंच 'अंतरंग' मला प्रतीत होतं.

आणखी एक शंका. गडकऱ्यांचं नांव 'राम' होतं. घरीं त्यांना 'लाल' या नांवानं हाक मारीत. 'रामलाल' हें त्यांच्या 'एकच प्याल्यां'तलं एक पात्रहि आहे. प्रेमाव्यतिरिक्त जीवनाला ध्येय असूं शकतं असं म्हणणारा 'रामलाल' म्हणजे उत्तर आयुष्यांतले गडकरी तर नसतील ?

असो. असा व्यासंगपूर्ण ग्रंथ लिहून मराठी टीकावाङ्मयांत मोलाची भर टाकल्याबद्दल प्रा० वाळिंबे यांना व या ग्रंथाच्या निमित्तानं माझे विचार व्यक्त करायला संधि दिल्याबद्दल 'युगवाणी'च्या संपादकांना धन्यवाद !

—सुरेश म. ढोलके

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गारंबीचा बापू*

*

श्री श्री. ना. पेंडसे यांनी या कादंबरींत पुष्कळशा तत्त्वांचें प्रतिपादन केलें आहे; त्यांत 'माणुसकी' हें एक आहे. त्यांच्या मतें माणुसकीचीं मुख्य लक्षणें दोन एक, होतां होईल तों इतर प्राणिमात्रांवर प्रेम करणें आणि दुसरें, स्वाभाविक मोहांना बळी न पडणें. ज्याच्या अंगांत माणुसकी आहे, त्याने अशा मोहांना बळी पडणाराकडे सहानुभूतीने पहावयाला शिकलें पाहिजे. जगाची रीत अशी असते कीं स्वतः जरी अशा मोहांना बळी पडलोंच, तरी स्वतःचा दोष, जिवाचा आटापिटा करून, झांकून ठेवावयाचा, आणि इतर लोक जर असे बळी पडले, तर मात्र त्या गोष्टीची चिवडा-चिवड करावयाची; "मियाँ मूठभर पण दाढी हातभर" या म्हणीप्रमाणे मूळ गोष्ट शक्य तितकी फुगवून त्याला अनंत फाटे फोडून दुर्लौकिकांचें भगदाड त्याला पाडून ठेवावयाचें. उलट अशा दोषांना बळी पडणें हें अत्यंत स्वाभाविक असून मनुष्याला अगदी अपरिहार्य आहे; हा सहानुभूतीचा विचार मनांत मुळीच येत नाहीं, यावर लेखकाचा फार कटाक्ष आहे.

इतर प्राणिमात्रांवर निरपेक्ष प्रेम करण्याची माणुसकी दाखवणारीं 'विठोबा' 'मावशी' 'दिनकर' 'दिनकर', 'राधा' वगैरे सारखीं पात्रें सुरेख वर्णिलीं आहेत. हीं माणसें जन्मतःच असली माणुसकी अंगांत घेऊन आलेलीं असतात, असेंच म्हणावें लागेल. "अण्णा खोत" 'सपाट बापू' बापूची आई ऊर्फ एशी, 'जगू' 'पांडभट' वगैरें सारखीं पात्रें या माणुसकीच्या अनुपस्थितीने या तत्त्वाचें प्रतिपादन अत्यंत दृढतेने आणि बेमालूम करतात.

खुद्द चरित्रनायक आणि त्याच्याबरोबर बायकोप्रमाणे राहूं लागलेली राधा या पात्रांकडे पाहिल्यास माणुसकीची प्रचीति चांगली पटते. दोघेहि मानवसुलभ पापांना बळी पडतात; परंतु त्यांतच त्यांची माणुसकी सामावली आहे, याचा अनुभव वाचकांना घडवतात. ते दोघे आपापल्यांत आणि त्यांच्याशीं साधर्म्य असलेलीं इतर पात्रें त्यांच्या दोषांकडे क्षमाशीलतेने पाहातात व तेथेच माणसाची साक्ष पटते. कादंबरी नायकप्रधान आहे. बापूचें चित्र चांगलेंच स्पष्ट, हुबेहुब व ठसकेबाज रेखाटलें आहे. बापू नांवाप्रमाणेच 'अफाट' आहे. त्याच्यांत विकसित होणारा बदल स्वाभाविक करण्याचा प्रयत्न केला आहे. नायक शोभण्यासारखा धीरोदात्तपणा या पात्रांत ठेवला आहे. परंतु त्या बरोबरच त्याला सर्व रीतींनी परिपूर्ण न करतां कांही कमतरता ठेवून त्याला पृथ्वीवरच्या माणसाप्रमाणे स्वाभाविक बनवला आहे. एकंदरींत व्यक्तिदर्शन छान आहे.

जितकीं सज्जन पात्रांचीं चित्रें हृदयंगम काढलीं आहेत, तितकीं स्पष्ट चित्रें वैधर्म्य दाखवणाऱ्या पात्रांचीं मात्र वाटत नाहीत. 'अफाट बापू' व 'सपाट बापू' या नांवांतच मौज वाटते सपाट बापू, अण्णा खोत, जगू, पांडभट वगैरे खलपात्रें विशेष स्पष्ट वाटत नाहीत. नायकाला विरुद्ध परिस्थिति निर्माण करण्यासारखा खल-पणाहि उठून दिसत नाही. बापूला श्रीमंत व्हावयाचें आहे व सरपंच व्हावयाचें

* लेखक—श्री. ना. पेंडसे, प्रकाशक मौज प्रकाशन, मुंबई, किं. ३॥ रु.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. श्रीमंत होण्यासाठीं तो धडपड खूप करतो; तरी 'हातांत धरलें कीं सोनें,' ही परिस्थिति बापूची फार झाली आहे. कोणताहि व्यापार केला की त्याला पैसे मिळतातच. शिवाय दापोली, हर्णे, साखरपेंडी या तीन जिल्ह्यांतली सुपारी तेथेच खपण्याबद्दल बापूची असाधारण कल्पना स्पष्ट होतच नाही. शिवाय बापूच्या स्वभावांतला रोटी व्यवहार, बेटीव्यवहाराबद्दलचा विधिनिषेध कांही वेळेला शंकनीय वाटतो. आपणामध्ये जन्मतःच या व्यवहाराबद्दलची विकृत कल्पना फारच बद्धमूल असते. ती नाहीशी व्हावयाला अत्यंत बलिष्ठ शक्तींशीं मनुष्याला झुंज घ्यावी लागते. तसें विशेष कांही न घडतां सर्व प्रकारचीं उच्च तत्त्वें बापूच्या आचरणांत आणून सोडलीं आहेत. खाण्याचे पदार्थ व खातांनाची संगति याबद्दल तमा न बाळगणें, गुरव, मुसलमान वगैरेबद्दलची भिन्नता न मानणें, भिन्न जातीची बायको पत्करणें, विधवेशीं, निसर्गाला साक्ष ठेवून, लग्न करणें वगैरे तत्त्वांची बापूच्या स्वभावांत रेलचेल केली आहे. त्यामुळे अस्वाभाविकतेची झांक मारते. पैसे मिळविणें व सांठवून न ठेवतां खर्च करून उपभोगणें हें तत्त्व खरोखरीच छान आहे. बापूमध्यें हें तत्त्व गोवलें, पण अशा रीतीने पैसे खर्च करून सबंध गारंबीला व इतरहि प्रवाशांना दबेल करून ठेवणें, विहीर, शाळा, धर्मशाळा इत्यादि बांधूनहि, सुखसोईनीं गारंबीला युक्त करून सरपंच होण्याची इच्छा त्यामागे दडवलेली असणें, इत्यादि मर्द मनुष्याला कमीपणा आणण्यासारख्या गोष्टी बापूच्या स्वभावांत आणण्याशिवाय लेखकाला इलाज नाहीसा झाला.

या सर्व बापूच्या स्वभावाला मिळालेल्या कलाटणीला कारण झालेली त्याची आई शेवटीं येऊन बापूशीं मिळतें घेते; दिनकरजवळ कांही रहस्यमय गोष्टींचा स्फोट करते. येथे कादंबरी पूर्ण करण्यांत लेखकाने आपलें कौशल्य चांगलेंच व्यक्त केलें आहे.

आपल्या पुस्तकांतून कोकणचें वर्णन बेसुमार वाढतें, याची जाणीव झाली आहे, असें प्रस्तावनेंत लेखक म्हणतो, तरी आंवरून धरलेली ही वर्णनाची लालसा या कादंबरींतहि वाचकाला गटंगळ्या खावयाला लावतेच. ही आंवरशक्ति आणखी वाढल्यास जास्त बरें होईल.

पुस्तकाची भाषाशैली सुरेखच आहे. 'म्हणणारेस' 'करणारेस' वगैरे कोंकणी क्रियापदें शोभतात. जरूर नसत्या ठिकाणीं तृतीया विभक्तींत कर्ते, 'जाण', 'साकव' 'सुडास येणें' वगैरे शब्दप्रयोग उठाव देतात. ज्या कोंकणपट्टीच्या पार्श्वभूमीवर कथेची उभारणी आहे, तिचा पाया चांगला भरला जातो. संवाद थोडक्यांत, आटोपशीर आणि स्वाभाविक वठले आहेत. वरील चित्र साधें असून चित्ताकर्षक आहे, एकूण पुस्तक प्रेक्षणीय, वाचनीय व मननीय आहे.

सौ. सुशीला कोठीवान.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उन्मेष आणि उद्रेक

★

[प्रा. भ. श्री. पंडित यांच्या 'उन्मेष आणि उद्रेक' या काव्यसंग्रहाचें परीक्षण करणारें पत्र श्री. देवदत्त नारायण टिळक यांनी प्रा. पंडित यांना लिहिलें. तें याठिकाणीं जसेंच्या तसें छापीत आहोंत. —संपादक]

श्री. प्रा. भवानीशंकर पंडित यांसी,

सप्रेम नमस्कार वि. वि.

काल गांवकरींत 'उन्मेष आणि उद्रेक' वर अभिप्राय पाहिला. त्याचें कटिंग सोबत पाठवीत आहे. ह्याच अंकांत 'भरली घागर'वरहि अभिप्राय आहे. त्यांत शेवटीं ह्मटलें आहे,

"श्री. भ. श्री. पंडित आपल्या अभिप्रायांत ह्मणतात, लक्ष्मीबाईच्या कवितांची संख्या फार नाही. त्या तोलांत कमी पण मोलांत भारी आहेत. त्यांच्या शद्बांचे रंग साधे आहेत. त्यांत भडकपणा नाही—पण चमचमाट आहे. त्यांची कविता प्रामुख्यानें भक्ति, करुण आणि वात्सल्य या तीनच रसांनी अभिषिंचित झाली आहे.

श्री. पंडिताच्या या म्हणण्याची प्रचीति ह्या संग्रहांतल्या कविता वाचतांना जागोजागीं येते."

गांवकरींतील अभिप्राय वाचल्यावर पुस्तक वाचून काढलें. आपण पुष्कळशा कविता नागपुरास मी आलों होतों तेव्हा प्रत्यक्ष वाचून व ह्मणून दाखविल्या होत्या, तेव्हा त्या परिचयाच्या वाटल्या.

सृष्टिवर्णन

'कृष्णे ! तुला प्रार्थना' हें वाचून लगेच पुढलें गीत वाचलें. 'हिंडावें गगनांत' मधील सृष्टिवर्णन अधिक परिणामकारक वाटलें. शेवटीं स्वतः धुकें बनून, वनश्रीची शोभा पहात पहात आनंदांत विरून जावें ही कल्पना फार सुंदर वाटली. पर्जन्यराजाचें स्वागत (४८) 'object drawing' प्रमाणें वाटतें तर वसंतास केलेलें आवाहन (७१) अधिक Vague स्वरूपाचें वाटतें. कारण हें Object drawing नाही. वसंत म्हटल्यावर मनांत जे तरंग उठतात त्यांचें हें चित्रण वाटतें. 'अवकाशीं झोक गंध ! कर दशदिशेस धुंद !' ह्या ओळी किंवा 'पांखरास व भुंग्यास फळांफुलांचीं मधें पाज' ही कल्पना रम्य आहे. 'विरंगुळा' हीहि सृष्टिवर्णनपरच असली तरी प्रत्येक कडव्यांतून एखाद्या शब्दानें किंवा ओळीनें तीं objective नसून subjective असल्याचें ध्वनित होतें. म्हणजे असें कीं सारीं शांतिसुखाचा अनुभव देत असलीं तरी मुख्य म्हणजे कविहि त्याच दृष्टिकोनांतून तिकडे पाहात असल्याचें चटकन् ध्यानांत येतें व वाचणाऱ्यावरहि ह्या दृश्याचा तोच परिणाम होतो. उजाड माळ (२८) व एक चित्र (७०) हीं चित्रें विषण्णतेचे रंग भरून तयार केलेलीं दिसतात. 'उजाड माळ' मधील खुरटें गवत, झाडाझुडपांचा व ओढ्याचा अभाव. उन्हाचा तडाखा व थंडीचा कडाका हीं पाहून 'गिरीशां' च्या 'सुंदर हिरवे माळ'ची तरं ही दुसरी बाजू नव्हे ? असें वाटूं लागतें. ह्या कवितेंतील शेवटचा विखारी जिवाणूंचा व त्याहूनहि भटक्या जिवाचा उल्लेख

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिणामकारक झाला आहे. चित्र भयाण असलें म्हणजे उपमा वगैरेहि भेसूर घेण्याची हातोटी तुम्हांला उत्तमच साधली आहे. 'एक मित्र' (७०) मधील एकाकी वृक्षाला अस्थिपंजरप्राय जरात्कारूची उपमा चित्राची खुमारी वाढविते 'ये वरून ये! ये!' मधील लुसलुशीत कल्पना कोठे, व हें राठ वर्णन कोठे! 'जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे' परंतु सामान्य जनांस जें रम्य वाटणार नाही त्यांतली रम्यता कवीला दिसते व ती तो काव्यद्वारा प्रगट करतो. उजाड माळाचें नि बर्डी टेकडीचें भयाण चित्र कवीला जितकें आकृष्ट करतें तितकेंच कोमल कलिका व तारका ह्याहि त्याला आकर्षितात.

'प्रेमरसा'चा मनांत उद्भव होतांच केशवसुतांना 'सकलहि सुंदर पाहुन भुलतात' व 'स्वर्ग धरेला चुंबायाला खाली लवला' असें भासूं लागतें. (स्वर्गधरेच्या चुंबनविधीची टिळकांनीहि कल्पना केलेली आहे) दुसरें बर्नार्ड शॉ म्हणतो "Love heightens the gifts which a man has learnt with" ह्या दोहोंचें प्रत्यंतर 'प्रणयप्रभात' व 'सहसंचार' यांत येतें. प्रीतीमुळे सर्व गोष्टी सुंदर वाटाव्यात हें तर खरेंच पण कवीला तर सृष्टिसौंदर्याची जात्याच आवड आहे व ही देणगी प्रीतिमुळे अधिक देखणी झाली आहे. खेरीज सखीच्या सहवासांत सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेण्याची इच्छा माणसाला नेहमीच वाटत आलेली आहे.

ह्या दोन्ही गीतांत प्रातःकालचें वर्णन आहे. त्यामुळे स्वप्नरंजनापेक्षा त्यांत उत्साह व जीवंतपणा ह्यांचाच अधिक आढळ होतो. 'प्रणयप्रभात' हें 'प्रबोधन' आहे. सहसंचार तसा नाही. त्यामुळे प्रबोधनांतील अत्यंत अस्पष्ट अशी ध्वनित शृंगाराची लकेर त्यांत नाही. सखी असली म्हणजे प्रीति आलीच परंतु ह्या कवितेचा उगम प्रीतिपेक्षा उत्साह व जीवंतपणा ह्यांतून झाल्यासारखा वाटतो. ह्या कवितांत शृंगार नाही असें नाही. भयविवशा व 'डोळे हे सखि' व तुझें चलनवलन (३५) ह्या शृंगारिक आहेत. ह्यांतील शृंगार प्रामाणिक वाटतो. 'असें कसें म्हणूं लोक काय म्हणतील?' अशी त्यांत शंका नाही व निःशंक परंतु तो जितका निःसंकोच (Free) आहे तितकाच नाजुक व विशुद्ध आहे. भाव शृंगारिक असला तरी त्यांत रांगडा धसमुसळेपणा नाही.

विरहावस्थेतले स्मृतितरंगहि गोड, काव्यात्म व नाजुक आहेत. विरहविलाप-मधील 'रंग खेळलों संगीं असें म्हटलें तरी त्यांत महत्त्व' रंगापेक्षां 'जिवालागि लावुनी घेतलेल्या खुळ्या मायेला' अधिक आहे. 'गेल्या दिनाच्या' (१०) स्मृती तशा निर्मल भावांनीं भरलेल्या आहेत. एकमेकांच्या संगतींत सृष्टिशोभेची मजा लुटण्याची कल्पना वर उल्लेखली आहे. ती स्पष्ट शब्दांत ह्या कवितेंत आली आहे एवढेंच. 'कलहान्तरिता' (१६) जुन्या वळणाची दिसते. तिच्यांत आजच्या विरहापेक्षा संस्कृतांतला विप्रलंभ शृंगारचा आहे. 'त्यागी उपेक्षितेचे' (१७) अंतरंग व त्याच्या विव्हळ स्मृति ज्यांत सांगितल्या आहेत तें कडवें—

> करपंकज गुंतवून कुरळ कुंतली
> नजरेवर नजर स्थिर करिसि आपुली
> माझें मज देहभान राहिना मुळीं
> ओंवाळी तुज वरुनी जीव मी खुळा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साधेंच पण प्रामाणिक व म्हणूनच फार परिणामकारक व सहज सुंदर वठलें आहे.

लाभो तुज सौख्य सख्या ! हेंच मज हवें

आणि

विसर मला ! छाया परित्यजिन मानुला !

असा शेवट करून, कवितेच्या शेवटीं भावनेचा परमोच्चबिंदु गांठण्याचें वैशिष्ट्य पुन्हा एकदा प्रगट केलें आहे.

(१४) केतकी आणि नाग, (१३) फुलपांखरूं आणि पतंग ह्या दोहोंत पहिली सर्वच दृष्टींनी सुंदर आहे. मध्यवर्ति कल्पना तर सुंदर आहेच पण ती वठलीहि आहे सुंदरच. थोडक्यांत व नेमक्या शब्दांत केतकीचें व वणव्याचें चित्र हुबेहूब डोळ्यांपुढें उभें केलें आहे. त्यांतल्यात्यांत ' सरसर वळसे घेत घेत कुणि नाग निघाला जावे ' ही ओळ पाहा. ' घेत घेत कुणी ' ऐवजी ' घेत कुणी हा ' असें म्हटलें असतें तर कर्णमधुरता फारशी कमी झाली नसती परंतु मग डोळ्यासमोर हुबेहूब चित्र उभें राहिलें नसतेंच नसतें, एवढें सामर्थ्य व कौशल्य ' घेत घेत ' ह्या साध्या शब्दांत आहे.

सारा वेळ घरांतच राहणाऱ्याला घर कोंबडा म्हणतात पण जीवनाच्या सर्व अंगांचा आस्वाद घेणाराला घराची—home ची–जी ओढ असते ती निर्व्याप प्रकृतीची असते. ' घरकुला'चें वातावरण वेगळेंच. 'निद्रावश रमणी' व 'माझी प्रिया सावळी' ह्या दोन गीतांत मला तुमच्या प्रीतीपेक्षा ह्या वातावरणाशीं एकजीव झालेल्या भावनाच अधिक आढळल्या. (कदाचित् हें चूकहि असेल.) इतका हळुवार आदरभाव गृहिणीविषयींच वाटणें शक्य. शांत, शालीन शील, साधेपणा, तापल्या मनास शांतविण्याची तिची वृत्ति, तिचें भाव सौंदर्य हीं प्रेयसीचीं नसतीलच असें नाही. (बाकी गृहिणी प्रेयसी नसते असें कोणी सांगितलें ?) तरी एकंदरीत तीं गृहिणीलाच अधिक लागूं पडतात. तीच गोष्ट '—तूंच' ची (४१). अपत्य संभवांतील तू–मी ह्यांची 'मृदु गुंफण' हृद्य आहे. 'घराकडे परततांना' मधील 'चार डोळे' व 'घराकडे'—मधील हळके हळके उमलत जाणारी घराची ओढ चटकन मनांत भरतात. 'संसारगीत' मधें रस कोणता ? सुख, तृप्ति व समाधान हाच ह्या रसाचा स्थायीभाव म्हटला पाहिजे. 'गृहसम्राट्' 'खेळ' व 'चिमणा व नाजूक गुलूबशी' हीं तीन्ही वत्सलभावाने ओथंबलीं असलीं तरी गृहसम्राट् व नाजुक गुलबशी हीं बापाच्या भूमिकेवरून लिहिलेलीं वाटतात. 'खेळ व चिमणी—' ही मात्र निस्संशय मातृवात्सल्यांतूनच उमटलेली कविता वाटते.

(४०) 'कसें धरावें तुज लागीं' ही एकच अंतर्मुख स्वरूपाची कविता आढळली. परमेश्वराचें सान्निध्य मनास —नव्हे जीवास 'भावतें', तर्क कर्कशतेची धाव तेथवर पोचणें शक्य नाही. ही कविता हळुवारपणे मांडलेली आहे.

रोजच्या जीवनांत 'किडके सडके खुरट रोप' (२७) कामाचें नाही. कुढत बसण्यापेक्षा, उदास होण्यापेक्षा मन मोकळें हास्य कवीला अधिक रुचतें. ' कुढ्या जीवाला असें सांगितलें आहे. ह्याच कवितेचा पुढला भाग ' मनुजा हास हांस ' (५४) हा वाटतो. ह्यांतहि अनेक दाखले देतां घेतां अखेरच्या कडव्यांत कळस काम करून दाखविले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जलद जलांतुन, जल जलदांतुन
गृह मातींतुन, माती गृहांतुन
रात्र दिनांतुन, दिन रात्रींतुन

हें कडवें ह्मणजे 'जातस्यहि धृवो मृत्युः धृवं जन्म मृतस्यच' ह्या गीतांतील तत्त्वज्ञानांचें अत्यंत सुंदर रीतीने मांडलेलें रूप वाटतें.

प्रेम व व्यवहार (२९) ह्या गीताचें तात्पर्य ठीक आहे खरें परंतु ज्या कल्पनेवर तें बसविलें आहे ती कल्पना चंद्राने पृथ्वीवर व पृथ्वीने सूर्यावर निष्फळ प्रीती करणें—ह्याहून मनोज्ञ आहे. 'चारु चंद्रिके—' मधील कल्पना शास्त्रशुद्ध आहे तरी ती—

'गुंफुनि निज किरणजाल
घाल तया प्रेम माळ
उधळूं दे तुजवरती त्यास मौक्तिकें'

असल्या ओळींनी नटविली असल्याने काव्यात्म झाली आहे.

'परित्यक्ता' (३०) हा विषय नवा वाटत नाही. उलट 'टाकुन मज जासि कुठे' ह्याचा विषय तोच असला तरी हीचं कविता 'परित्यक्ते,' पेक्षा मनोरम उतरली आहे. ह्याचें कारण मला वाटतें हिचा विषय एक 'प्रसंग' हा आहे. रोजच्या रोज मनांत येत राहणाऱ्या विचारतरंगाचें तें चित्रण नव्हे. प्रथमच सासरी निघालेल्या बालिकेच्या भावना 'वियोगिनींत' उत्तम प्रतिबिंबित झाल्या आहेत. त्या बावरलेल्या पोरसवदा सहचारिचेंच 'भयाविवशा' हें एक वेगळ्या प्रसंगीचें वर्णन आहे. की काय अशी कल्पना मनास चाटून जाते. परंतु वियोगिनीचा अवतार सात वर्षांनंतर घडलेला आहे, असें लेखन कालावरून ध्यानांत येतें.

भावचित्रणावरून प्रत्यक्ष चित्रणाकडे वळतां 'ओलेती' डोळ्यांत भरते. ह्यांतहि निर्मळ कलात्मकता आणि विशुद्ध सौंदर्यदृष्टि ह्यांचाच खेळ आहे. त्यामुळे ठाकुरसिंगाच्या चित्राचें हें चित्रण व परीक्षण उत्कृष्ट वठलें आहे. अश्लीलता चित्रांत नसून प्रेक्षकांत असते आणि हा दावा ह्या रसग्रहणात्मक व वर्णनात्मक कवितेने खरा करून दाखविला आहे.

सामाजिक व राजकीय ह्या सदरांत पडतील अशा केवळ ११ कविता आढळल्या. त्या ३,५, ३४, ४२, ४६, ४९, ५०, ५९, ६०, ६१ व ५६ अशा आहेत. पत्र फारच लांबलें, वरील कवितांसंबंधीं त्या सुंदर आहेत एवढेंच म्हणतों. त्यांतल्या त्यांत (३) 'दगडांच्या खाणीजवळी'लं शेवट

हात याचा छे! दगड जोरदार
हृदय त्याचें छे! दगड तें कठोर

ह्या ओळी फार बहारीच्या वाटल्या. दगड तें च्या ऐवजी दगड तो म्हटलें असतें तर कदाचित् त्या हृदयाची कठोरता अधिक पटली असती.

देवी स्वतंत्रते (५) मधील तिसऱ्या ओळींत निर्गुणाच्या ऐवजी निर्घृणा पाहिजे होतें का? वर्ग वैषम्य (३४) ह्यातील देवाला विचारलेला प्रश्न फारच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खोचक वाटतो: तूं-तूं असशी सर्व श्रेष्ठ, तूं सत्तामत्ताविद्त्तांत विशिष्ट—परि तुलातरि का आहे अनुभव ? सांग ! आमच्या मतें मात्र देव मनुष्य-रूप धारण करून आला (येशू खिस्त). तेव्हां त्याला हे सारे अनुभव आले व त्याने त्याच गोष्टी नष्ट करण्यासाठीं स्वतःच्या प्राणाचें अर्पण केलें. मात्र कायदे करून व बंधनें घालून माणूस सुधारणें शक्य नाही. त्याला अंतरीची आग पेटायला पाहिजे व तिच्यांत त्याचीं हीं सारीं जळमटें जळून जायला पाहिजेत—तेव्हा ही सुधारणा होईल. आधी स्वराज्य कां आधी स्वाराज्य हा हा प्रश्न आहे.

(४२) पुरापासून दूर—मधील शेवटली ओळ एक बोधवाक्य म्हणून वापरायला हरकत नाही. टिळकांची 'जनसेवा ही ईश्वरसेवा' ही पंक्ति कित्येक संस्थांनी आपलें ब्रीदवाक्य म्हणून उचलल्याचें पाहण्यांत आहे.

पृथ्वी पृथ्वीच ठेवुं आणि बनवूं स्वर्गाहुनी सुंदर। मी ह्या ओळीवर अगदी खुश होऊन गेलों.

आजच्या मानवतेस (५०) सांगितलेला उपदेश 'शोक त्याग, त्यज हिंसा, अंगीकार, सत्नीती' हा 'शाळेशी जातांना मुलांनी वाटेंत तमाशा पहात राहूं नये' सारखा उपदेश वाटतो. ही ओळ 'क्षोभ हा पुरे' —— एवढीच अर्धवट ठेवली असती तर परिणामकारक झाली असती. अर्थात् तो उपदेश वाईट आहे अशातला प्रकार नाही. पण Association मुळे तात्पर्यासारखा वाटतो. तें ज्याचें त्याने काढावें असें अलीकडील शिक्षणतज्ञ म्हणतात.

कलिकुबेर— [५९] अलीकडील काळ्याबाजारवाल्यांना मिळत असलेला सरकारी पाठिंबा व त्यांची चलती यांची आठवण करून देते.

> हे व्यापारी उदमी खंदे, यांच्यापाशी अगणित मत्ता
> संरक्षण दे यांना सत्ता.

परवा तर ह्या गोष्टीची उघड उघड कबुली दिली गेल्याचें ऐकलें.

"आज" [६१] जीवीत आज काळांचें भक्षक—अगदीं निर्भेळ सत्य. [५६] 'श्रमजीवी' येथेहि

> फुलें, फळें, तरु चढती वरवर
> कारण खालीं मूळांचा थर

येथेच ही कविता थांबती तर ?

असो, परीक्षण आणि पत्रहि खूप लांबलें. माफी याचितों.

आपला

दे. ना. टिळक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जागें झालेलें एक खेडें

अनुवादक : लक्ष्मणराव जाधव

लीच्छीयाकाव हें त्या गांवाचें नांव. जिल्हा शु-आङ्गयाव, पोर्ट आर्थर, देश चीन. चारशे एकसष्ठ लोकवस्तीचें तें गांव. परंतु या चिमुरड्या खेड्यानेच "आदर्श साक्षर गांव" म्हणून तीनदां प्राविण्य-पदकें मिळविलीं आहेत.

गेल्या वर्षापर्यंत या खेडें-गांवांतील एकशे आठ लोकांना साक्षरतेचा गंध-सुद्धा नव्हता. आज ती स्थिति नाही. या एकशे आठ निरक्षर लोकांपैकी अठ्याण्णव लोकांना आठशे पेक्षा जास्त शद्व लिहितां वाचतां येतात. उरलेल्या दहा जणांना चार पांचशे शद्व येतात. त्या गांवांत आज साक्षीला सुद्धा अडाणी माणूस मिळणें शक्य नाही.

चीनमध्ये आज अधिकारारूढ असलेल्या कम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखाली या खेड्याचें उत्पादन वाढलें आहे. गेल्या वर्षी 'शेती सुधार' झाल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक विपन्नावस्था नाहीशी झाली. त्यामुळे खेड्यांतील प्रत्येक गोष्टीमध्ये झपाट्याने परिवर्तन होत आहे.

सन १९४६ त म्हणजे चीनच्या या नव स्वातंत्र्यापूर्वी या खेडेगांवांत एकंदर बावन्न कुटुंबें होतीं. या बावन्न कुटुंबांच्या मालकीची जवळ जवळ २३०० माव (१ मावः ०.१६४७ एकर) जमीन होती. मात्र प्रत्येक कुटुंबाच्या हिश्शाला येणारें वांटप विचित्र होतें. एक जमीनदार व तीन श्रीमंत शेतकरी अशा फक्त चारच लोकांच्या ताब्यांत अकराशे माव जमीन होती. आक्रमक जपान्यांच्या ताब्यांत आठशे माव जमीन, उरलेली निकस जमीन, फक्त चारशें माव त्या बाकीच्या अठ्ठेचाळीस कुटुंबांत विभक्त झाली होती. अशा विषम जमीन–विभागणीत शेतकरी व दारिद्र्य गळयांत गळा घालून रडणार नाहीत तर काय करतील ?

त्या अठ्ठेचाळीस कुटुंबांतील लोकांचें जीवन म्हणजे एक जिवंत नरकवास होता. ते त्रस्त लोक त्राग्याने कोणा एकाच्या घरीं एकत्रित होऊन पत्ते कुटीत बसत. कोळी लोक दारू पिऊन तर्रर होत व घरीं जातांच बायका पोरांना मारहाण करीत. हे लोक गरिबीने गांजले व रोगराईने त्रस्त झाले म्हणजे गुडघे टेकून देवाची करुणा भाकीत आणि शेतांत पिकें पिवळीं होऊन सडायला लागलीं तरी त्याकडे लक्ष देत नसत.

ती विचित्र सृष्टि, आज भूतकाळांत जमा झाली आहे.

शेती–सुधार अंमलांत आल्याबरोबर त्या खेड्यांतील प्रत्येक व्यक्तीस चार माव जमीन मिळाली. शिवाय पडित जमिनीपैकी चारशे माव जमीन नव्यानेच लागवडीस आणली गेली आहे. त्यामुळे तेथील प्रत्येक व्यक्ती आज पूर्वीपेक्षा जास्त जमीन पिकवीत आहे. एवढेंच नव्हे तर पिकें जास्त काळजीपूर्वक पिकविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

शेतकऱ्यांच्या विचारसरणींत अमूलाग्र बदल झाला आहे. "पूर्वीच्या काळांत आपल्या दारिद्र्याच्या कारणपरंपरेला स्वतंत्र अस्तित्व होतें. शेती–सुधार अंमलांत आल्यानंतरहि जर जीवन चांगलें म्हणजे सुखी व संपन्न करतां आलें नाही तर त्याचा दोष स्वतःकडेच येईल," असें त्यांना आज वाटतें.

गेल्या सहा महिन्यांचा कालावधि घेतला तर आपणांस असें आढळून येईल की या छोट्या वेळांत सतरा गुरेढोरें व शेतीचीं बरीचशीं औजारें यांची भर त्या खेडेगांवच्या मालमत्तेंत पडली आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशा तऱ्हेने राजकीय व आर्थिक दृष्टया उन्नति झाल्यावरोबर तेथील शेतकऱ्यांनी लगेच सांस्कृतिक शिक्षणाची मागणी केली. वांग-शिएनतांग सारख्या वाचन-नैपुण्य मिळविलेल्या शेतकऱ्याचे उद्गार ऐकले तर आपणास आश्चर्याचा धक्का बसेल. तो म्हणतो कीं—

"आतां आम्ही लोकच जर मालक झालों आहोंत तर ही मालकी ज्ञानाशिवाय कशी चालवितां येईल ?"

त्या खेड्यांतील कोणतीहि व्यक्ति आज आपला पाठ चुकवीत नाही. तो पाठ स्त्री-वर्गाचा असो, पुरुषांचा असो कीं वृद्ध आजीबाईंच्या समितीची ती रात्रीची बैठक असो. शेताच्या कामाने थकल्या भागल्याचा बहाणा करून किंवा हवा बिघडल्याची सबब सांगून कोणीहि व्यक्ति आपला शिक्षणाचा वर्ग चुकवीत नाही.

एके काळीं ली-तेह-छिन या संधिवाताने पछाडलेल्या माणसाला शिकण्याची तीव्र इच्छा होती. त्यावेळीं तें खेडें जपानी आक्रमकांच्या ताब्यांत होतें. तो गरीब व आजारी आहे या सबबीवर शाळेच्या चालकांनी दोनदा शाळेंत भरती करण्याचें नाकारलें. त्यामुळे त्यावेळीं त्याला शिक्षण घेतां आलें नाही. आज तोच गृहस्थ साक्षर झाला आहे. दोन हजार पेक्षा जास्त शब्द तो शिकला. दुसऱ्या एका बाईचें उदाहरण देतां येईल. ही वांग-कुई-लान नांवाची बाई पांच मुलांची आई आहे. असें असून सुद्धां ही शेतकऱ्यांचें जेवण तयार करतांनाच स्वतःचा अभ्यास करते.

शेतकऱ्यांच्या घराच्या भिंती, आज वाचन-प्रसार समीतीने दिलेल्या प्रशस्तीपत्रांनी सुशोभित झालेल्या आहेत. हीं सर्टिफिकेटस सुबक चौकटींत मढविलेलीं असून त्यावर त्यांचा चेअरमन माओ-से-तुंग चा फोटो लावलेला आहे.

त्या खेड्यांत जवळ जवळ चाळीस वर्तमानपत्रें येतात व त्याची वर्गणी तेथील शेतकरी देतात. त्या वर्तमानपत्रांत किती तरी विविधता आहे. मुलेंबाळें झाडांच्या सावलीत खेळत असतांना वृद्ध स्त्रिया त्यांच्यावर देखरेख करीत असतात नी त्यांचें आवडतें "शेतकऱ्यांचें वर्तमानपत्र" त्या बाया वाचीत असतात.

कांहीजणी बसल्या बसल्या आपापल्या धड्याची उजळणी करतात. अशा तऱ्हेने उत्पन्न कसें वाढवावें, अभ्यास कसा करावा व स्व-मेहनतीने सुखवैभव कसें प्राप्त करून घ्यावें याची पूर्ण कल्पना तेथील प्रत्येक खेडुतास आहे. पांच वर्षांपूर्वी तेथील स्त्रियांना डोंगर पठारांत जाऊन शेतीवर मेहनत करण्याची लाज वाटत होती. आज त्याच स्त्रियांना शेतीवर काम करण्यासाठी डोंगर पहाडांत जातां आलें नाही तर वाईट वाटतें. ही गोष्ट मोठ्या फुशारकीने त्याच स्त्रिया तुम्हांला सांगतील. चालू उन्हाळ्यांत तेथील पंधरा एक स्त्रियांनी नांगर धरण्याचें काम शिकून घेतलें. नवरा बाहेर गांवीं गेला होता म्हणून आपल्या सोळा वर्षाच्या मुलाची मदत घेऊन ली-युपिंग या सहा मुलांच्या आईने स्वतःच तीस माव जमीन नांगरली. आज तेथील स्त्रिया खेळीमेळीने नांगर खांद्यावर घेऊन डोंगर पठारांत शेती नांगरण्यास जातात. नांगरट संपल्यावर शाळेंत जातात.

काम संपलें म्हणजे या तरुण स्त्रिया हातपाय तोंड धुवून स्वच्छ वस्त्र परिधान करतात. जांभळा किंवा लाल रेशमी पोशाख व डोक्यास पांढरा शुभ्र स्कार्फ हा त्यांचा आवडता पोशाख. हा पोशाख घातल्यावरून कोणीतरी त्यांना म्हटलें कीः—

" आज अगदी जमीनदारच्या नवविवाहित तरुणीच दिसता की तुम्ही"

त्या बरोबर त्यांनी उत्तर दिलें—

" बाबांनो, पोशाखावरून स्त्रियांना ओळखण्याचे दिवस गेले. आज आम्ही शेतकरी स्त्रिया सुद्धां हा पोशाख करूं शकतों नी करणें आवडतें."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ली–मावो–शिआंग नांवाचा साठ वर्षांचा एक म्हातारा होता. गेलीं तीस वर्षें कुळ म्हणून त्याने अंगमेहनतीने शेती केली होती. एवढे काबाडकष्ट करून सुद्धा दरवर्षी त्याची गरीबी व दैन्यावस्था वाढतच चालली. कंटाळून त्याने शेतांत अंगमेहनत करण्याचें सोडून दिलें. जुगार खेळणें, दारु पिणें, शेजाऱ्याशी तंटेबखेडे करणें हाच इतरांच्या प्रमाणे त्याचाहि धंदा बनला होता. शेती–सुधार कायद्याप्रमाणे त्याला स्वतःची जमीन मिळतांच त्याच्या पुष्कळशा वाईट सवयी सुटल्या. त्याने आपल्या दोन मुलांच्या मदतीने चार माव पडित जमीन उठवली.

निरनिराळया धंद्यांतील कुशल कारागीर व जरूरीपेक्षा जास्त असलेले कामगार लोक यांचें एकीकरण झाल्यामुळे त्यांचें नवीन धंद्यांत रुपांतर होऊं लागलें आहे. त्याखेड्यांतील असे चौदा लोक गिरणीकामावर गेले. या शेतकऱ्यांनी त्या गिरणी धंद्यासाठी लागणाऱ्या कच्चा मालाचा पुरवठा व्हावा म्हणून त्या पिकाची पेरणी केली. अशा तऱ्हेने नव्वद माव जमिनींत वाटाणे लावण्यांत आले आहेत व तीस माव जमिनींत कापूस व ताग याची लागवड झाली. ही त्या खेड्याच्या इतिहासांतील पहिली महत्त्वाची गोष्ट होय.

पूर्वी रिकामा वेळ घालविण्याचें साधन म्हणजे पत्ते खेळणें. या नवीन जगांत पत्त्याचें उच्चाटन झालें. दिवसा वाचनांचे वर्ग, संध्याकाळीं करमणुकीचे कार्यक्रम; संमेलनें व यांको नृत्य वगैरे गोष्टी आज तेथील शेतकऱ्यांची करमणूक करीत आहेत. वृद्ध व तरुणासाठीं "संस्कृति-स्टेशन" वर निरनिराळया "सांस्कृतिक-मनोरंजन-मंडळ्या" आपापले कार्यक्रम करीत असतात. कांही पन्नाशी उलटलेल्या वृद्ध स्त्रियांनी सुद्धां "यांको" नृत्य करून लोकांचें मनरंजन करणारा असा आपला निराळा संघ स्थापन केला आहे. या वर्षी तेथे जो वसंतोत्सव साजरा करण्यांत आला त्या उत्सवांत 'संस्कृति-स्टेशन' वर बरेचसे मनोरंजक कार्यक्रम करण्यांत आले. तीनशे पेक्षां जास्त लोकांनी त्यांत भाग घेतला.

चीनमधील हें चालू नव-युग व गत भूतकाळ या दोन युगांमध्ये मानवी परस्पर संबंधामध्ये मोठें परिवर्तन झालें आहे. आज तेथे शेजाऱ्या-पाजाऱ्यांचीं भांडणें ऐकूं येत नाहीत. रस्त्यावर उभे राहून चाललेली शिवीगाळ व क्षुल्लक कारणावरून हमरी तुमरीवर येणें हेंहि अदृश्य झालें आहे. त्या खेड्यांत आजकाल आपणास जनसत्ताक कौटुंबिक बैठकी भरलेल्या दिसतील. नणंद-जाऊ; सासू-सून; सासरा-जांवई वगैरे प्रसिद्ध जोड्या पूर्वीचा भांडखोरपणा सोडून परस्परांना सहाय्य करतांना दिसतील, एवढेंच नव्हे तर अभ्यासांत व उत्पन्न वाढविण्यांत ते एकमेकांना साहाय्य करीत आहेत.

घरापुढील आवारांत जिकडे तिकडे स्वच्छता दिसेल. तरुण-वृद्ध सगळेच लोक स्वच्छ व आल्हाददायक पोषाखांत राहतात. शरीरस्वास्थ्याचें–आरोग्याचें–महत्व सर्वांनाच पटलेलें आहे व त्याचें जरुरी पुरतें ज्ञान प्रत्येकाला आहे. बाळंतपणासाठी आधुनिक मिडवाइव्हज् असल्याच पाहिजेत अशी मागणी गरोदर स्त्रियांकडूनच येत आहे. सांथीतून बचाव व्हावा म्हणून किंवा रोगराई पासून संरक्षण होण्यासाठी आतां कोणीहि देवाची प्रार्थना करीत नाही किंवा मंदिरांतहि जात नाहीत. त्यामुळे अंगारे–धुपारे करणाऱ्या पुजाऱ्यांना व मांत्रिकांना आपला पूर्वीचा तो फसवेगिरीचा धंदा सोडून मेहनत-मजुरीने स्वतःचें पोट भरावें लागत आहे. या लिन्छियाकाव्ह खेड्यासाठी एक नर्सरी उघडण्यांत आली आहे. तिच्यांत मुलांसाठी बहुविध खेळणीं आहेत. त्यामुळे तेथील मुलांना खेळ व करमणूक करीत करीत शिक्षण प्राप्त करून घेण्याची सोय झाली. तेथील शेतकऱ्यांना जेव्हा मोकळा वेळ मिळतो तेव्हा ते आपल्या गांवापासून–शहरा पर्यंतचा रस्ता बनविण्याचें काम करतात. येत्या हिंवाळ्यांत जर भरघोस पीक येऊन फायदा झाला तर हेच शेतकरी आपल्या खेडेगांवामध्ये वीज तयार करण्याचें प्लँट लावून त्या खेडेगांवास वीज पुरवठा करण्याचा विचार करीत आहेत.*

---

*" चायनीज वुइमेन इन 1950 " च्या आधारे.

संघवार्ता

श्री. ना. रा. शेंडे,
चिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

विदर्भ साहित्य संघाचें १४ वें वार्षिक अधिवेशन

सांस्कृतिक प्रदर्शनाचें उद्घाटन

विदर्भ साहित्य संघाच्या १४ व्या वार्षिक अधिवेशनाच्या कार्यक्रमाला ता. ३ मे १९५२ रोजीं जबलपूर येथे महाराष्ट्र विद्यालयाच्या विस्तीर्ण पटांगणांत स. ८॥ वा. सांस्कृतिक प्रदर्शनाच्या उद्घाटनाने प्रारंभ झाला. या सम्मेलनाला स्वागत मंडळाचे सुमारे ७०० सदस्य व १०० प्रतिनिधि हजर होते. प्रथम संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. गो वि. भावे यांनी सागर विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाचे प्रमुख डॉ. मो. गं. दीक्षित यांचा परिचय करून दिल्यानंतर प्रा. डॉ. मवाळकर यांनी त्यांच्या संशोधनकार्याचा यथोचित गौरव केला. त्यानंतर डॉ. दीक्षित यांनी सांस्कृतिक प्रदर्शनाच्या उद्घाटनाचा बहुमान आपल्यास दिल्याबद्दल आभार मानून आपलें भाषण वाचून दाखविलें व प्रदर्शनाचें उद्घाटन केल्याचें जाहीर केलें. त्यांचें भाषण अन्यत्र दिलें आहे.

डॉ. दीक्षित, प्रा. संतलाल कटारे, श्री. वासुदेवराव सुभेदार, प्रा. म. म. वा. वि. मिराशी प्रभृति संशोधकांनीं आणलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या वस्तु, चित्रें, वस्त्रें, भांडीं वगैरे ऐतिहासिक साहित्य या प्रदर्शनांत सुबक रीतीने मांडून ठेवलेलें होतें.

कार्यकारी मंडळाची सभा

या नंतर सकाळीं १० वा. संमेलनस्थानीं वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा भरली आणि दुपारीं २ वा. त्याच जागीं वि. सा. संघाची साधारण सभा भरली.

या दोन्ही सभांच्या कामकाजाचा वृत्तांत स्वतंत्र दिला आहे.

खुलें अधिवेशन

ता. ३ मे रोजीं सायंकाळी ५॥ वा. खुल्या अधिवेशनाला प्रारंभ झाला. या अधिवेशनाला जबलपुरांतील प्रमुख नागरिक, मराठी साहित्य संघ आणि हिंदी साहित्य संघ यांचे कार्यकर्ते, महाकोशलमधून आलेले महाराष्ट्रीय प्रतिनिधि आणि वि. सा. संघाचे सदस्य उपस्थित होते. स्वागताध्यक्ष श्री. गो. वि. भावे यांनी आपलें भाषण वाचून दाखविलें; नंतर न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति यांना संमेलनाचें उद्घाटन करण्याची विनंति केली.

अध्यक्षांचा ३० संस्थांतर्फे सत्कार

यानंतर पूर्वाध्यक्ष आणि त्यावेळचे सर चिटणीस श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांना संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. त्या विनंतीला प्रा. वऱ्हाडपांडे, सौ. मनोरमाबाई नावलेकर, श्री. गो. बा. पुल्लीवार आणि प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांनी अनुमोदन दिल्यावर सौ. कुसुमावती-बाई देशपांडे ह्या स्थानापन्न झाल्या; त्यांचा जबलपूरमधील आणि महाकोशलमधील निरनिराळ्या ३० संस्थांतर्फे पुष्पहार घालून सत्कार करण्यांत आला.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संमेलनाला आलेले शुभसंदेश

यानंतर स्वागत मंडळाचे कार्यवाह प्रो. गो. मो. रानडे यांनी संमेलनाला आलेले शुभसंदेश वाचून दाखविले. त्यांत ना. काकासाहेब गाडगीळ, लो. बापूजी अणे, ना. पं. रविशंकर शुक्ल, ना. मा. सा. कन्नमवार, ना. दीनदयाल गुप्त, श्री. अ. का. प्रियोळकर, भाई श्री. शं. नवरे, श्री. पु. य. देशपांडे, डॉ मा. गो. देशमुख, श्री. दा. वि. गोखले, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, श्री. त्र्यंबकराव देहानकर, श्री. प्र. ना. खोडे, श्रीमंत आबासाहेब पारवेकर देशमुख, श्री. माणिक बैतुले प्रभृतींचे संदेश होते.

आचार्य विनोबा भावे यांनी संमेलनाला पाठविलेला संदेश शेवटच्या दिवशी प्रा. गो. मो. रानडे यांच्या हातीं पडला. तो संपूर्ण अन्यत्र प्रसिद्ध केला आहे.

यानंतर सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी आपलें अध्यक्षीय भाषण वाचून दाखविलें.

‘जुगार’ नाटकाचा प्रयोग

रात्रौ १० वा. सौ. मुक्ताबाई दीक्षित यांच्या ‘जुगार’ या नाटकाचा प्रयोग खमारिया नाट्य कलोपासक मंडळातर्फे करून दाखविण्यांत आला.

हिंदी—मराठी ‘साहित्य गोष्ठी’

ता. ४ रोजी सकाळीं ९ वा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली हिंदी–मराठी साहित्य गोष्ठींच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. या कार्यक्रमांत श्री. व्यौहार राजेंद्र सिंह, श्री. भवानीप्रसाद तिवारी, प्रा. रामेश्वर शुक्ल [अंचल], श्री. रामानुजलाल श्रीवास्तव, श्री. रमेश वर्मा, श्री. इंद्रबहादुर खरे, श्री. श्रीबाल पांडे, श्री. बासलजी, श्री. बळदुवाजी, श्री. श्रीकृष्णस्वामी, श्री हरिशंकर मिश्र, श्री. छैलू वृंदावन, श्री. नर्मदाप्रसाद सराफ प्रभृति हिंदी साहित्यिक हजर होते.

श्री. भवानीप्रसाद तिवारी यांनी उपस्थित हिंदी साहित्यिकांचा परिचय करून दिला. नंतर प्रा. डॉ. कालते यांनी उपस्थित मराठी साहित्यिक आणि वि. सा. संघाचे प्रमुख कार्यकर्ते यांचा परिचय करून दिला. डॉ. कोलते, यांचा परिचय प्रा. भी. गो. देशपांडे आणि श्री. कुंडलराय मोहेकर यांनी करून दिला. या नंतर अनिल, श्री. शरचंद्र मुक्तिबोध, डॉ. कोलते, सौ. मनोरमाबाई नावलेकर, श्री. पंढरीनाथ रानडे, प्रा. प्र. सी. करमरकर, श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर प्रभृति मराठी कवि आणि उपस्थित हिंदी कवि यांचें काव्य गायन झालें. गीताबाई साने यांचें भाषण झालें. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी उचित समारोप केल्यावर हा कार्यक्रम संपला.

खुल्या अधिवेशनाची दुसरी बैठक

सायं. ६ वा. खुल्या अधिवेशनाची दुसरी बैठक सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं सुरू झाली. अधिवेशनांत मंजूर झालेले १ ते ४ ठराव अन्यत्र दिले आहेत.

संघाध्यक्षांना मानपत्र

सायं. ७॥ वा. जबलपूर हिंदी साहित्य संघातर्फे सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांना मानपत्र आणि जबलपुरांतील हिंदी साहित्यिकांचा ग्रंथसंभार समर्पण करण्याचा समारंभ झाला. यावेळीं श्री. भवानीप्रसाद तिवारी, प्रा. रामेश्वर शुक्ल, श्री. रामानुज

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीवास्तव आणि श्री. गंगाविष्णु पांडे यांची हिंदी-मराठी भाषांचें सहकार्य आणि आदान-प्रदान यासंबंधीं भाषणें झालीं. सौ. कुमुमावतीबाई देशपांडे यांनी, प्रा. शुक्ल यांच्या सूचनेनुसार, इंग्रजींत भाषण करून आदान प्रदानाच्या कल्पनेचा पुरस्कार केला; व हिंदी-मराठी या दोन्ही भाषांच्या सौहार्दपूर्ण सहकार्याने मध्यप्रदेश हा तात्विक अर्थाने 'दुभाषी' प्रांत व्हावा, अशी इच्छा व्यक्त केली. श्री. गो. वि. भावे आणि प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे यांचीहि हिंदींत समयोचित भाषणें होऊन हा कार्यक्रम संपला.

'पाणिग्रहण', नाटकाचा प्रयोग

रात्रीं १० वा. जबलपूर येथील महाराष्ट्र नाट्य मंडळातर्फे आचार्य प्र. के. अत्रे यांनी लिहिलेल्या 'पाणिग्रहण' या नाटकाचा प्रयोग करून दाखविण्यांत आला.

नवकाव्यावरील चर्चा

ता. ५ रोजीं सकाळीं ९ वा. श्री. आ. रा. देशपांडे (कविवर्य अनिल) यांच्या अध्यक्षतेखालीं नवकाव्यावरील चर्चेला प्रारंभ झाला. या चर्चेत श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, श्री. बापू अडावतकर, प्रा. डॉ. शं. दा पेंडसे, श्री. जामदार, श्री. त्र्यं. खं. गंधे, प्रा. भी. गो. देशपांडे आणि श्री. गीता साने यांनी भाग घेतला. श्री. आ. रा देशपांडे यांनी समारोप केल्यावर ही चर्चा संपली.

खुल्या अधिवेशनाची तिसरी बैठक

सकाळीं ११ वा. अधिवेशनाची शेवटची बैठक सौ. कुसमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. तींत ५ ते ७ हे ठराव मंजूर झाले. ते अन्यत्र दिले आहेत. त्यानंतर वृज किशोर पारितोषिका संबंधींची माहिती अध्यक्षांनी दिली.

नव्या अध्यक्षांचें अधिकार ग्रहण

नंतर अध्यक्षांनी १९५२ सालचे नियुक्त अध्यक्ष प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे यांना अधिकार ग्रहण करण्याची विनंति केली. तदनुसार त्यांनी अधिकारग्रहण केल्याचें जाहीर करून नव्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि जुने कार्यकर्ते हे आपल्याला हार्दिक सहकार्य देतील अशी आशा व्यक्त केली.

अध्यक्षांचा समारोप

नंतर सौ. कुमुमावतीबाई देशपांडे यांनी गेल्या दोन दिवसांतील कामकाजाचा आणि ठरावांचा आढावा घेऊन समारोप केला; व न्या. मू. मंगळमूर्ति, श्री. पु. य. देशपांडे, डॉ. कोलते, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. बाळासाहेब ढवळे आणि श्री. माडखोलकर यांनी सतत दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.

पारितोषिक प्रदान

नंतर नवे सरचिटणीस श्री. ह. ना. नेने यांनी कै. सरस्वतीबाई देशमुख पारितोषिक हें कै. रा. ब. ना. दा. वाडेगांवकर यांच्या 'मनोरमा व शब्दरत्न' या अनुवादिक ग्रंथाला देण्यांत येणार असल्याचें जाहीर केलें; व स्वागत मंडळाचे उत्कृष्ट व्यवस्थेबद्दल आभार मानले. कै. श्री. सरस्वतीबाई देशमुख (पारवेकर) पारितोषिक व वृजकिशोर पारितोषिक यांचा संपूर्ण खुलासा अन्यत्र दिला आहे.

स्वागतोपाध्यक्ष प्रा. वा. वि. भावे यांनी प्रतिनिधी, पाहुणे, संमेलनास साहाय्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था या सर्वांचे आभार मानले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघाध्यक्षांचा सत्कार

सायंकाळीं ५॥ वाजतां श्रीदत्त भजन मंडळ, टिळक मंदिर आणि महाराष्ट्र वाचनालय यांच्यातर्फे संघाध्यक्षांचा सत्कार करण्यांत आला. रात्रीं ७॥ वा. जबलपूर जर्नलिस्टस् असोसिएशनतर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्यावेळीं असोसिएशनचे अध्यक्ष श्री. गणेशप्रसाद नायक यांनी प्रथम स्वागत करतांना श्रमिक पत्रकारांच्या मागण्यासंबंधी उल्लेख केला. श्री. माडखोलकर, न्या. मू. मंगळमूर्ति, श्री. बाळासाहेब ढवळे आणि श्री. ए. श्री. पटवर्धन यांची भाषणें झाल्यावर सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी इंग्रजींत भाषण करून श्रमिक पत्रकारांच्या मागण्यासंबंधीं विदर्भ साहित्य संघातर्फे सहानुभूति व्यक्त केली.

करमणुकीचे कार्यक्रम

त्यानंतर संमेलन स्थानी मंडला येथील वनवासी सेवा मंडळातर्फे आदिवासी नृत्य संगीताचा आणि भातखंडे संगीत महाविद्यालयातर्फे भारतीय संगीत विकास दर्शनाचा असे दोन कार्यक्रम करण्यांत आले.

अशा रीतीने विदर्भ साहित्य संघाचें अधिवेशन सतत तीन दिवसानंतर समाप्त झालें.

कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा जबलपूर येथे शनिवार ता. ३ मे १९५२ रोजीं सकाळीं १० वाजतां संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यतेखाली भरली होती. सभेंत पुढील कामकाज झालें:—

(१) सन १९५१ सालच्या चिटणीसांनी सादर केलेल्या प्रतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता.

(२) सन १९५१ च्या हिशेबाच्या तक्त्याला सर्वानुमते मान्यता.

(३) सन १९५२–५३ सालचें जें अंदाजपत्रक सादर करण्यांत आलें, तें साधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यांत यावें, असें ठरलें.

(४) श्री. महेश्वर गद्रे आणि कंपनी व श्री. एस. के. माणकेश्वर यांना सन १९५२–५३ सालासाठी हिशेब तपासनीस नेमण्यासाठी सर्वानुमते मान्यता.

(५) श्री. शं. ना. सहस्रबुद्धे यांनी सरचिटणीसांना आज ता. ३ मे रोजीं सकाळीं १० वाजतां आणून दिलेली दोन पत्रें (२६ व ९ अशा सह्यांनिशी असलेलीं), अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे वाचण्यांत आलीं. या पत्रांत, "कार्यकारिणीच्या दिनांक २७-१-५२ च्या सभेंत झालेला ठराव न्यायाचा नाही शिवाय आवश्यकहि नाही सबब याविषयीं फेरविचार करून तो ठराव रद्द करण्याची कृपा करावी," अशी विनंती करण्यांत आलेली होती. या प्रश्नाचा विचार करून सभेने पुढील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

"श्री. शं. ना. सहस्रबुद्धे यांच्या २२-१-५२ च्या पत्रांत वापरलेल्या भाषेबद्दल कार्यकारी मंडळाने केलेला ठराव रद्द करण्याची मुळीच आवश्यकता वाटत नाही. इतकेंच नाही, तर श्री. सहस्रबुद्धे यांनी पाठविलेलीं पत्रें आणि छापलेलीं पत्रकें हीं विचारांत घेतां प्रस्तुत पत्रांवर सह्या करणाऱ्यांना देखील कार्यकारी मंडळाने केलेला ठराव न्याय्य पण सौम्य होता असेंच वाटेल अशीच या सभेला खात्री आहे.

असें असलें तरीहि श्री. शं. ना. सहस्रबुद्धे हे या प्रकरणाबद्दल बिनशर्त जाहीर लेखी माफी मागतील तर कार्यकारी मंडळाला ता. २७-१–५२ च्या ठरावाचा फेरविचार करणें शक्य होईल."

सूचक—डॉ. वि. भि. कोलते
अनुमोदक—श्री. तु. ना. काटकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साधारण सभा

विदर्भ साहित्यसंघाची वार्षिक साधारण सभा, 'युगवाणी'त दिलेल्या पूर्वसूचनेनुसार, शनिवार दि. ३ मे १९५२ रोजीं दुपारीं जबलपूर येथे संमेलनाच्या जागी संघाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती.

पूर्ववृत्तें आणि हिशेब यांना मंजुरी

प्रथम दि. २६ नोव्हेंबर १९५० च्या साधारण सभेचें वृत्त वाचून मंजूर करण्यांत आलें; व तदनंतर दि. २८ एप्रिल १९५१ च्या साधारण सभेचें आणि १३ एप्रिल १९५२ च्या विशेष साधारण सभेचें वृत्त हीं वाचून मंजूर करण्यांत आलीं. वार्षिक हिशेब सभेपुढे मंजुरीसाठीं ठेवण्यांत आलें असता, वार्षिक वृत्तांत व हिशेबाचा तक्ता इंग्रजींत प्रसिद्ध झाला आहे, तो यापुढे मराठींत प्रसिद्ध व्हावा, असें श्री. आ. रा. देशपांडे यांनीं सुचविलें. त्यावर अध्यक्षांनी असा खुलासा केला कीं, हिशेबतपासनिसांनीं तपासून दिलेला हा तक्ता अधिकृत म्हणून जसाच्या तसा देण्याच्या हेतूनें यंदा तो इंग्रजींत प्रसिद्ध करण्यांत आला. परंतु यापुढे तो मराठींतून देण्यांत येईल. हिशेबाचें पत्रक वाचून पहाण्यास सभासदांस थोडा अवधी देण्यांत आला. त्यासंबंधीं सभासदांनीं विचारलेल्या प्रश्नांस समर्पक उत्तरें दिल्यानंतर तो मंजूर झाला.

अंदाजपत्रकाला मंजुरी

यानंतर, पुढील सालचें अंदाजपत्रक मंजुरीसाठीं आलें असता 'युगवाणी'-साठीं होणाऱ्या खर्चाचा विचार करतांना, 'युगवाणी' मासिक करण्यांत यावें, असा ठराव डॉ. कोलते यांनीं मांडला; व त्यासाठीं खर्चाची रकमहि वाढविण्याची मागणी केली. परंतु, फक्त खर्चाच्या रकमेच्या मंजुरीबद्दलच आता विचार करिता येतो, 'युगवाणी' मासिक करण्याबद्दल वेगळा ठराव मग विचारांत घेणें योग्य होईल, असें अध्यक्षांनी सांगितलें. यावर 'युगवाणी' साठीं रु. ३००० ऐवजी रुपये ३६०० असा आकडा खर्चखातीं घालावा, ही डॉ. कोलते यांची सूचना मंजूर होऊन तदनुसार दुरुस्त केलेलें अंदाजपत्रक मंजूर करण्यांत आलें.

हिशेबतपासनिसांची नेमणूक

नंतर श्री. एस. के. माणकेश्वर यांस हिशेबतपासनीस म्हणून नेमण्यास सभेने मान्यता दिली.

लवादाची नेमणूक केली नाही

नव्या नियमाप्रमाणे निवडणूक-लवादाची आवश्यकता असल्यानें त्याच्या नियुक्तीची सूचना सूचनापत्रकांत देण्यांत आली होती. परंतु जुन्या घटनेप्रमाणे भरलेल्या आजच्या सभेंत अशी निवडणूक होऊं नये, असा कांहीं सभासदांचा आक्षेप आल्यामुळे व डिसेंबरच्या साधारण सभेंत अशी निवडणूक होण्यास सवड असल्याकारणानें हा विषय आजच्या सभेंत गाळण्यांत येत आहे असें अध्यक्षांनी सांगितलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विश्वस्तपत्राच्या मसुद्यावर चर्चा

यानंतर सभेच्या माहितीसाठी कार्यकारी मंडळाने ता. १३ एप्रिलच्या सभेंत मंजूर केलेला विश्वस्तपत्राचा मसुदा वाचून दाखविण्यांत आला. त्यावर, "विश्वस्त व कार्यकारी मंडळ यांत वाद उद्‌भवल्यास विश्वस्तांवर अविश्वासाचा ठराव करण्यांत यावा व मग त्यांनी राजीनामे द्यावेत, वगैरे सूचना दुरुस्ती म्हणून प्रा. बनहट्टी यांनी पाठविल्या आहेत व मी त्या सभेपुढे ठेवीत आहें," असे न्या. मंगळमूर्ति यांनी सांगितलें पण, त्याच वेळी स्वतःस त्या सूचना अमान्य असल्याचाहि अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. नंतर त्या सूचनांवर चर्चा झाली. सध्याच्या कायद्याप्रमाणे असले वाद अधिक सुलभपणे मिटण्याची सोय कशी आहे, हेंहि त्यांनी त्याबरोबर विशद केलें. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेत अशी तरतूद आहे. ती कोणत्या हेतूने करण्यांत आली होती, यासंबंधीचें प्रो. पोतदार यांचें खुलाशाचें पत्रहि त्यांनी सभे-समोर वाचून दाखविलें. डॉ. पेंडसे यांनी महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या जुन्या परिस्थितींत घटनेमध्ये घालण्यांत आलेला अशा प्रकारचा नियम विदर्भ साहित्य संघाच्या बाबतींत अनावश्यक असल्याचें प्रतिपादिल्यावर प्रा. बनहट्टी यांच्या सूचना अमान्य झाल्या.

विश्वस्तपत्रासंबंधीचा ठराव

तदनंतर विश्वस्तपत्राबाबत प्रा. दा. ल. अडोणी यांनी पुढील ठराव मांडला प्रा. भी. गो. देशपांडे यांनी त्याला अनुमोदन दिलें.

"(१) विश्वस्तपत्राचा मसुदा व विश्वस्तांचीं नांवें, विश्वस्तपत्राचे उद्देश व मिळकतींचें वर्णन इत्यादि सर्व मजकूर या सभेस मान्य आहे.

(२) विश्वस्तपत्राच्या नोंदणीच्या वेळीं विश्वस्तपत्र करणारांचीं नांवें घालण्याचा, तसेंच नोंदणी कायद्याच्या दृष्टीने जरूर त्या भाषेच्या दुरुस्त्या करण्याचा अधिकार ही सभा संघाचे नवे अध्यक्ष प्रा. डॉ. पेंडसे आणि न्या. के. तु. मंगळमूर्ति या दोघांस देत आहे." हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

'युगवाणी' संबंधी शिफारस

यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने डॉ. कोलते यांचा 'युगवाणी' पुन्हा मासिक करण्याबद्दल कार्यकारी मंडळाला आदेश देण्यासंबंधीचा ठराव विचारार्थ आला; व त्यावर आर्थिक दृष्टीने उलट सुलट चर्चा झाली. अखेर श्री. शं. वा. रानडे यांनी अशी उपसूचना मांडली की, "शक्य तर 'युगवाणी' हें मासिक करण्यांत यावें अशी शिफारस करावी" असे शब्द "आदेश देते" या शब्दांऐवजी घालावे. डॉ. कोलते यांनी ती उपसूचना मान्य केली; व मग पुढील ठराव सर्वानुमते मंजूर झाला:— "ही साधारण सभा कार्यकारी मंडळास अशी शिफारस करिते की, शक्य तर 'युगवाणी' हें मासिक करण्यांत यावें."

अधिवेशनांत मंजूर झालेले ठराव

विदर्भ साहित्यसंघाच्या जबलपूर येथे ता. ३, ४ आणि ५ मे १९५२ रोजीं भरलेल्या वार्षिक अधिवेशनांत मंजूर झालेले ठराव पुढे दिले आहेतः—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१) मराठी भाषा आणि साहित्य यांच्याविषयीं प्रेम बाळगून त्यांची यथाशक्ति कळकळीने सेवा करणारे पुढील साहित्यिक आणि विदर्भ साहित्यसंघाचे सदस्य दिवंगत झाल्याबद्दल विदर्भ साहित्यसंघाच्या या अधिवेशनाला अत्यंत दुःख होत आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखांत विदर्भ साहित्यसंघाचे सर्व सदस्य सहभागी आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्यांना सद्गती देवो.

(१) प्रा. श्री. त्र्यं' पुणतांबेकर (२) तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे (३) श्री. कृ. म. धर्माधिकारी (४) श्री. स. ह. बल्लाळ (५) श्री. दा. आ तनखीवाले (६) श्री. श्री. पु. सरमुकादम (७) श्री. रा. का. तटणीस (८) रामभाऊ पेंडसे, जबलपूर.

—अध्यक्षांकडून

(१) हिंदी आणि मराठी विभागसीमारेषेवरील बहुसंख्य लोकांची मातृभाषा मराठी असलेल्या जिल्ह्यांमधून प्राथमिक शिक्षण पूर्णतया मराठींतून देण्याची आणि दुय्यम शाळांतून मराठी माध्यम घेण्याची सोय असावी, या दृष्टीने प्रांतांतील सर्व भागांची पहाणी करून योग्य अधिकाऱ्यांकडून यासंबंधीच्या तक्रारी दूर करून घेण्यासाठी ही सभा पुढील कार्यकर्त्यांची एक समिति नेमीत आहे—

(१) प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे (१) श्री. पु. य. देशपांडे (३) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर; (४) डॉ. पंजाबराव देशमुख आणि (५) प्रा. डॉ. वि. भि. कोलते.

सूचक—श्री. विनायक दामोदर अलोणी
अनुमोदक—श्री. त्र्यंबक खंडेराव गंधे.

(३) (अ) विदर्भसाहित्यसंघाची भारत सरकारला अशी आग्रहाची विनंती आहे की, त्याने पुराणवस्तूंच्या नवीन आयोजनामध्ये अखिल मध्यप्रदेशाकरितां त्या खात्याचे एक स्वतंत्र केंद्र नागपूरसारख्या मध्यवर्ती ठिकाणीं स्थापन करावें; व त्याच्याद्वारे या राज्यांतील एखाद्या प्राचीन ठिकाणीं शक्य तितक्या लवकर उत्खननाचें कार्य सुरू करावें.

(आ) सागर विद्यापीठाने पुरातत्व विभागाची स्थापना करून भारतीय संस्कृति व इतिहास यांच्या संशोधनास व अभ्यासास चालना देण्याचा स्तुत्य उपक्रम या राज्यांत प्रथमच करून जें प्रगतीचें पाऊल टाकलें, त्याबद्दल हें संमेलन त्या विद्यापीठाचें अभिनंदन करितें; व नागपूर विद्यापीठानेहि अशाच प्रकारचें कार्य अविलंबें हातीं घ्यावें आणि त्यासाठी राज्यशासनाने योग्य तें आर्थिक साहाय्य करावें, अशी या संमेलनाची त्यास आग्रहाची विनंती आहे.

सूचक—प्रा. भी. गो. देशपांडे
अनुमोदक—प्रा. दा. ल अडोणी

(४) विश्वसंस्कृति आणि साहित्य यांचें संरक्षण आणि संवर्धन होण्यासाठी सर्व साहित्यसेवकांनी साहित्यांतून विश्वशांतीचा आग्रहाने पुरस्कार करावा आणि मानवतेला विघातक अशा प्राणहारक साधनांचा सक्रिय निषेध करावा, असें या संमेलनाचें मत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सूचक—श्री. चंद्रशेखर माडखोलकर
अनुमोदक—श्री. पंढरीनाथ रानडे

(५) सागर विद्यापीठाने देशी भाषापैकीं हिंदीचा म्हणून स्वीकार केला हें युक्तच झालें. पण या राज्याचें द्विभाषिक स्वरूप व महाकोशलमध्ये हिंदी भाषिकांच्या खालोखाल असणारी अनुपेक्षणीय अशी मराठी भाषिकांची संख्या ही लक्षांत घेऊन मराठीचाहि वैकल्पिक माध्यम म्हणून त्या विद्यापिठाने समावेश करावयास पाहिजे होता. तो न केल्याने उत्पन्न होणारी मराठी भाषिकांची दुरवस्था टाळण्यासाठी सागर विद्यापीठाने शक्य तेवढ्या लवकर मराठीला माध्यम म्हणून मान्यता द्यावी आणि मराठी माध्यमांतून शिक्षण देण्याची व्यवस्था होईपर्यंत ज्या विद्यार्थ्यांना मराठी उत्तरपत्रिका लिहिण्याची इच्छा असेल त्यांना तसें करण्यास अनुज्ञा द्यावी, अशी हें संमेलन शिफारस करितें.

सूचक—डॉ. शं. दा. पेंडसे
अनुमोदक—श्री. वि. कृ. देशपांडे
श्री. द. कृ. पाठक

(६) विदर्भ साहित्यसंघाचें कार्य गेलीं कांहीं वर्षे प्रौढ आणि युवक क्षेत्रांत यशस्वी रीतीने चालू आहे. यापुढे मुलांचेंहि क्षेत्र या संघाकडून हातीं घेण्यांत यावें. निदान मुलांच्या वाङ्मयीन व कलात्मक चळवळी करणाऱ्या ज्या लहान लहान संस्था निरनिराळ्या शहरांत कार्य करीत आहेत, त्यांना संलग्न करून घेऊन या महत्वाच्या कार्याला विदर्भ साहित्यसंघाने सक्रिय उत्तेजन द्यावें, अशी या संमेलनाची शिफारस आहे.

सूचक—श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर, अनुमोदक–श्री. चन्द्रशेखर माडखोलकर.

(७) (१) वाङ्मयीन पुस्तकांवरील विक्रीकर रद्द करावा, (२) नागपूर व सागर विद्यापीठांच्या क्षेत्रांत योग्य बदल करावा, (३) या प्रांतांत प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांची सूचि वेळोवेळी प्रसिद्ध करावी, (४) या प्रांताचें नवें गॅझेटिअर तयार करावें, (५) शिक्षणखातें व विद्यापीठें यांत मराठीच्या हितसंबंधांचें रक्षण व्हावें हें पहाण्यासाठी निरीक्षण समिती नेमावी, अशा आशयाचे ठराव गेल्या वर्षी संमेलनाने केले व ते सरकारकडे पाठविण्यांत आले. परंतु त्यांवर सरकारकडून अद्यापिहि योग्य कार्यवाही झालेली दिसत नाही. तरी सरकारने त्या ठरावांतील सूचनांप्रमाणे व्यवस्था लवकर करावी, अशी हें संमेलन सरकारास आग्रहाने विनंति करितें.

अध्यक्षांकडून

कै. श्री. सरस्वतीबाई देशमुख (पारवेकर) पारितोषिक

'मनोरमा व शब्दरत्न' याला मिळालें

कै. श्री. सरस्वतीबाई देशमुख (पारवेकर) पारितोषिक हें आतापर्यंत विदर्भ साहित्यसंघाच्या वार्षिक अधिवेशनाच्या प्रसंगीं दिलें जात असे. पण यंदापासून या पारितोषिकासंबंधींचीं सर्व कामें वि. सा. संघाकडे देण्यांत आलीं असून, या कामासाठी संघाने नियुक्त केलेल्या समितितर्फे तें कार्य करण्यांत आलें आहे. या पारितोषिकासाठी यंदा खालीलप्रमाणे सात पुस्तकें आलीं:—(१) मनोरमा व शब्दरत्न

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(मराठी भाषांतर) लेखक— कै. रा. ब. ना दा. वाडेगांवकर, (२) मराठी ग्रंथ संग्रहालयांचा इतिहास, संपादक— ल. वा. पडोळे (३) खरें पंचांग कसें मिळेल ? लेखक स. मा. करमळकर. (४) देशद्रोही : लेखक यशपाल; अनुवादक — सीताबाई ब्रह्म (५) श्रीगुरु जयराम वाक्सुधा : लेखक श्रीगुरु जयराम महाराज विवरेकर. (६) अखेरची संधि : लेखक—मा. ज. कानेटकर; (७) ज्ञानदेव (किरण १, २, ३ : लेखक—श्रीगुरु जयरामबाबा विवरेकर. १९५१ सालच्या पारितोषिकांसाठी पुस्तकांची शिफारस करण्यासाठी म. म मिराशी, डॉ. शं. दा पेंडसे व अध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांना परीक्षक म्हणून नियुक्त करण्यांत आलें होतें. त्यांनी एकमताने 'मनोरमा व शब्दरत्न' या ग्रंथाच्या विवरणात्मक मराठी भाषांतराला हें पारितोषिक द्यावयाचें ठरविलें. त्याप्रमाणे हा निर्णय जबलपूर येथील वि. सा. संघाच्या अधिवेशनाचे प्रसंगीं जाहीर करण्यांत आला.

व्रजकिशोर पारितोषिक

'विदर्भ साहित्यसंघा' तर्फे होणाऱ्या 'साहित्यविनीत' परिक्षेंत जो हिंदी मातृभाषा असलेला विद्यार्थी गुणानुक्रमे पहिला येईल, त्याला अकरा रुपयांचें पारितोषिक दिलें जाईल हें पारितोषिक तिरोडा (जि. भंडारा) येथील एक साहित्यप्रेमी श्री. व्रजकिशोर मिश्र यांनी पांच वर्षांसाठी ठेवलें असून, तें दरवर्षी दिलें जाईल. या पारितोषिकाचा यंदासाठी अकरा रुपयांचा हप्ता मिळाला असून त्याबद्दल वि. सा. संघ त्यांचा फार आभारी आहे.

'युगवाणी 'चें संपादक मंडळ

या वर्षी संघाध्यक्षांनी खालील संपादक मंडळ नेमलें आहे.

संपादक : प्रा. वा. कृ. चोरघडे, व्हाइस प्रिंसिपल, कॉमर्स कॉलेज, नागपूर.

संपादक मंडळ : प्रा. भ. श्री. पंडित, प्राध्यापक, विदर्भ महाविद्यालय, नागपूर.
डॉ. मा. गो. देशमुख, प्राध्यापक, नागपूर महाविद्यालय, नागपूर.
प्रा. अ. ना. देशपांडे, प्राध्यापक, हिस्लॉप कॉलेज, नागपूर.
श्रीयुत मधुकर मंगरूळकर, ॲडव्होकेट, महाल, नागपूर.

करमणुकीवरील करांतून नाटकांना माफी

विदर्भ साहित्यसंघाच्या अध्यक्षांना सरकारचें पत्र

विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांना मध्यप्रदेश सरकारच्या स्वतंत्र महसूल खात्याकडून पुढील पत्र आलें आहेः—

नागपूर, ९ मे १९५२

मध्यप्रांत–वऱ्हाड करमणूक–कराचा कायदा १९३६ याच्या सातव्या विभागानुसार मिळालेल्या अधिकारान्वयें, मध्यप्रदेश सरकार, या कायद्याच्या तिसऱ्या विभागाच्या अंमलबजावणींतून, या राज्यांतील रंगभूमीवर होणाऱ्या सर्व नाट्यप्रयोगांना, हें परिपत्रक निघाल्या दिवसापासून, माफी देत आहे.

सही आर. आर. सिंघ
सचिव, मध्यप्रदेश सरकार, स्वतंत्र महसूल खातें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संमेलन

अधिवेशन १४ वें, जबलपूर

अध्यक्षीय भाषण

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व साहित्यप्रेमी सज्जन हो,

आपणापुढे माझा पहिला शब्द आभाराचाच असणार. विदर्भ साहित्य संघासारख्या थोर प्रतिष्ठा पावलेल्या साहित्य संस्थेच्या कार्याची धुरा आपण, मला कोणत्याहि संघटनेचा अनुभव नसतांना व साहित्याच्या प्रांतांतहि माझ्या हातून कांही खरोखरी नांवाजण्याजोगें कार्य झालें नसतांना गेल्या वर्षभर मजकडे सोपवली; या आपल्या मजविषयींच्या विश्वासाबद्दल मी आपली अत्यंत ऋणी आहे. हें विश्वासाचें ऋण आपण आपलें सहकार्य मला देऊन प्रतिदिनीं वाढविलें आहे.

गेल्या कांही वर्षापासून विदर्भ साहित्य संघाच्या कार्यामध्यें विशेष भरीवपणा व आशय येत चालला आहे, हें आपण जाणतां. या काळांत संघाच्या कर्तृत्वाचा विकास होत गेला तशी त्याची प्रतिष्ठाहि वाढत गेली. गतवर्षी संघाच्या कार्याला अनेक दृष्टींनी शासनाकडून मान्यता मिळवून व विदर्भ साहित्य मंदिरासाठी नागपुरांत एका प्रमुख ठिकाणीं विस्तृत अशी जमीन मिळवून गतवर्षीचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संघाला विशेष महत्वाचें स्थान प्राप्त करून दिलें. त्या बरोबरच आपणा सर्वांची जबाबदारीहि वाढली. कार्यालयाची स्थापना व व्यवस्था, मंदिराची उभारणी, सांस्कृतिक संघटना, भाषाविषयक जागरूकता इत्यादि अनेक कर्तव्यें आपणासमोर उभी राहिलीं. अशा महत्वपूर्ण काळामध्ये आपण या कार्याचा भार मजवर टाकला हा मी माझा फार मोठा गौरव समजते. या प्रकारें मातृभाषेची व भाषा बांधवांची सेवा करण्याची संधि आपण मला दिली याबद्दल आपले मनःपूर्वक आभार मानते. या कामीं आपण माझी निवड केली तेव्हांच मला जे सहकारी निवडून दिले त्यांच्या आधारावरच हें कार्य हातीं घेण्याची मी हिंमत केली. त्या माझ्या सहकाऱ्यांचेहि अत्यंत मनःपूर्वक व जाहीरपणें आभार मानण्याची ही संधि मी गमावणें शक्य नाही.

या संम्मेलनाच्या प्रसंगीं विदर्भ साहित्य संघ एक प्रकारें सीमोल्लंघन करीत आहे, असें समजलें जातें. आपले स्वागताध्यक्ष व त्यांच्या पाठीशीं असलेली मराठी मंडळी यांच्या आतिथ्यशीलतेनें व मराठी भाषेवरील निष्ठेमुळेच हा योग जमून आला आहे. व्यावहारिक दृष्ट्या, भौगोलिक व शासनाच्या दृष्टीनें हें सीमोल्लंघन असलें तरी विचारांतीं आपणाला खात्रीने असेंच वाटेल कीं आपण कोणत्याहि सीमेचें उल्लंघन करीत नाही. शासनाने आपल्या सोयीसाठीं निर्माण केलेल्या सीमा ह्या नेहमींच कृत्रिम, व्यावहारिक निर्वाहासाठीं केलेल्या असतात. व व्यावहारिक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आवश्यकतेपुरत्याच त्या लोकजीवनांतहि रूढ होतात. वस्तुतः सांस्कृतिक एकता व त्याहूनहि भाषिक एकता जेथे असते तेथे या शासननिर्मित सीमा तर जाणवत नाहीतच पण त्याहून कमी कृत्रिम अशा भौगोलिक सीमा देखील जाणवत नाहीत. सांस्कृतिक सीमा याच खऱ्या जीवनावर परिणाम करणाऱ्या व म्हणूत अपरिहार्य, निदान दुर्लंघ्य असतात. अशा दुर्लंघ्य सीमा जबलपूरच्या मराठी मंडळींच्या व आमच्यामध्ये कोठल्या? या उत्कट मातृभाषेच्या दृढ भावबंधनांनी आपण वेष्टिले आहोंत. एकाच सांस्कृतिक वातावरणांत आमचीं मनें पोसलीं गेलीं आहेत.

बुंदेलखंडाच्या छत्रसालच्या हांकेसरशी बाजीरावसाहेब पेशवे येथे धावून आले व तेव्हां पासून महाकोशलांतील महाराष्ट्रीय जीवनाला प्रारंभ झाला. येथे स्थायिक झालेल्या मराठी मंडळींनी आपल्या परंपरेचें इतकें जिवंत वातावरण निर्माण केलें कीं, घंटय्या नायडूसारख्या अमराठी कवींनी देखील मराठी रसाळ रचना केली. व भांडारे लेंभे, फणसाळकर, पावणस्कर यांनी मराठी कवितेच्या संपदेंत भर टाकली. अव्वल इंग्रजींतील येथील मराठी विद्वानांनी येथील नव्या इंग्रजी शिक्षणाचा पाया घातला. मराठी विद्वानांनी हिंदी गद्यालाहि वळण लाविलें. येथील मंडळींच्या मराठी बाण्याच्या प्रकर्षाचें एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे श्री. नीलकंठ धोंडो लिमये यांचे मराठी प्राथमिक शाळा स्थापण्याचे भगीरथ प्रयत्न होय. भगीरथाप्रमाणे अनेक वर्षे चिकाटीने प्रयत्न करून त्यांनी अखेर येथील मराठी मुलालेकरांपर्यंत मराठी शिक्षणाची जीवनगंगा आणून पोचविली. त्यांचें नुकतेंच प्रकाशित झालेले आत्मचरित्र म्हणजे जमखिंडीसारख्या दूरच्या गांवाहून आलेल्या येथील एका साध्या भोळ्या, गरीब मास्तराच्या मराठी बाण्याचें उत्तम प्रतीक होय. याच मराठी बाण्यामुळे महाराष्ट्र विद्यालयासारखी संस्था नांवारूपास चढली आहे. अशा अनेक मराठियांची ही कर्मभूमि म्हणजे मराठीचें पुण्य क्षेत्र आहे. तेथे आम्ही मराठीचा सोहळा साजरा करणें म्हणजे सीमोलंघन कसें? आमचें मराठीपण हा आमच्यांतील अभेद्य व अत्यंत प्रभावी असा दुवा आहे. जेथे जेथे मराठी भाषा बोलली जाते तेथे तेथे आमचें घर आहे. मराठी आद्य ग्रंथांचें ज्या ठिकाणीं पठण केलें जातें, मराठी देवदेवतांचें पूजन केलें जातें, मराठी ओव्या अंगाईगीतें गाइलीं जातात, व्रतें वैकल्यें पाळलीं जातात, हळदीकुंकू, मंगळागौरी साजऱ्या केल्या जातात, खो खो , हुतुतू, झिम्मा फुगड्या खेळल्या जातात त्या त्या ठिकाणीं आमच्या मनाचीं रोपटीं स्वाभाविकपणें रुजतात, व फुलतात. ज्ञानेश्वर तुकारामाच्या काव्याने जेथे लोकांच्या मनाचें उन्नयन होतें, आगरकर, चिपळूणकर, लोकमान्य टिळक इत्यादींच्या ओजस्वी लेखनावर जेथे बुद्धीला धार दिली जाते, केशवसुतांपासून आजच्या नवकवीपर्यंतच्या काव्याने जेथे भावचैतन्य फुलविलें जातें, तेथे तेथे महाराष्ट्र आहे. संघटनेच्या परिभाषेंत बोलायचें तर महाराष्ट्रांतील त्या सर्व ठिकाणीं विदर्भ साहित्य संघाचें स्वाभाविक क्षेत्र आहे. मराठीपण हा आमच्या एकतेचा पाया आहे.

मराठी भाषेच्या या सोहळ्यामध्ये महाकोशलीय विद्वान, रसिक, कवि, व लेखक सहभागी आहेत ही विशेष आनंदाची गोष्ट होय. ही घटना अनेक पिढ्यांच्या आपल्या सहकार्याला साजेशीच आहे; छत्रसालाच्या काळापासून सुरु झालेल्या महाराष्ट्र व महाकोशल यांच्या संबंधाशी सुसंगत अशीच आहे. तेव्हांपासूनच हिंदी साहित्य व मराठी साहित्य ही येथें जुळ्या भावंडासारखीं वाढलीं आहेत. हिंदी कवींनी मराठी रागांवर कवनें केलीं तशी मराठी लेखकांनी हिंदींत रचना केली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हिंदी भाषेने मराठी लेखकांना पुत्रवत् मानलें, व त्यांच्या सेवेचा स्वीकार केला. अशा या सहकार्याच्या स सहविचाराच्या भूमिकेवरूनच मी आज आपल्यापुढे भाषामूलक व्यक्तित्वाविषयी कांहीं विचार मांडणार आहे.

आतांच मी मराठी मंडळींच्या मराठीपणाविषयी बोलत होते. भाषामूलक व्यक्तित्वाचा हा एक प्रकार झाला. भाषामूलक व्यक्तित्व ही केवळ मराठी लोकांनाच लाभलेली एक देणगी, किंवा लागलेलें वेड आहे असें नाही, हें आपण जाणतां. भारतांतील प्रत्येक प्रमुख महत्वाच्या भाषिक समूहामध्ये असें वेगळें व्यक्तित्व व त्य बरोबरचीं कांहीं विशेष लक्षणें आढळतात. बंगाली, काश्मीरी, गुजराथी, मराठी पजाबी, कर्नाटकी, महाकोशलीय इत्यादि प्रत्येक व्यक्ति भारतीय आहे. तरीपण प्रत्येकाचें एक प्रादेशिक वैशिष्टच आहे. त्याची मातृभाषा हें या वैशिष्टयाचें प्रतीक, आहे. तिच्यामध्ये तें मुख्यतः निहित असतें व तिच्याद्वारें तें व्यक्त होतें. हें व्यक्तित्व व हीं विशेष लक्षणें, हीं त्या त्या भाषिक समाजाच्या अनेक शतकांच्या परंपरेने त्याला दिलेली देणगी आहे. ही परंपरा जीवनावरील अनेक संस्कारी शक्तींनीं बनविलेली असते. कांहीं अंशी त्या समाजाच्या भौगोलिक परिस्थितीने ती आकारास येते. तींत त्या समाजाचा सामाजिक वा राजकीय इतिहास सामावलेला असतो. अशा ह्या भौगोलिक व सामाजिक शक्तींनी बनविल्या गेलेल्या विशिष्ट व्यक्तित्वाला त्या त्या भाषेंत अभिव्यक्ति लाभलेली असते व जो जो जीवनानुभव भाषेमध्ये व्यक्त होतो तो तो पुढील जीवन संस्कारित करतो. प्रादेशिक परिस्थिति, तिच्यामुळे निर्माण झालेली परंपरा, तिची अभिव्यक्ति व या अभिव्यक्तीने संस्कारित झालेलें व्यक्तिमन यांची अशी एक अभेद्य साखळी असते. बंगाल, मद्रास वा महाराष्ट्र, काश्मीर, कूर्ग वा उत्तरप्रदेश यापैकीं प्रत्येक भाग हा भारताचा अंगभूत भाग आहे, व राहिला आहे. परंतु त्या प्रत्येक भागाची भौगोलिक परिस्थिति व ऐतिहासिक परंपरा यांच्यांतील भिन्नतेवर भाष्य करण्याची आवश्यकता नाही. एखाद्या एकसंध शिलेवर उभारलेल्या व दुसऱ्या एका एकसंघ शिलेच्या छपराखालीं सामावलेल्या अनेक दालनांच्या प्रासादाप्रमाणे भारतांतील हे अनेक विविधभाषी भाग भारतीयत्वाच्या, भारताच्या सनातन संस्कृतीच्या भरभक्कम पायावर उभे आहेत, आणि आजच्या भारतीय संस्कृतीच्या छत्राखालीं विसावले आहेत; आजचें एकछत्री भारतीय शासन व समान सामाजिक व आर्थिक व्यवस्था यांनी परस्परांशी निगडित झालेले आहेत. परंतु तरीहि त्या प्रत्येकाचें स्वतंत्र अस्तित्व, स्वतंत्र व्यक्तित्व कायम आहे. नव्हे, त्या स्वतंत्र व्यक्तित्वावर त्या प्रत्येकाच्या वैशिष्टयावर भारतीयत्वाचा गौरवहि अवलंबून आहे.

अशी ही विविधतेंतील एकात्मता भारतीय संस्कृतीमध्ये अनेक शतकांपासून रुजली, विकासली आहे. या विविधतेंतील एकात्मतेला रवींद्रनाथांनी महासागरावरील लाटांची उपमा दिली. आचार्य भाव्यांनी तिला वटवृक्षाची उपमा दिली. तिच्यामुळेच भारतीयत्वाला अथांगपणा व सनातनत्व प्राप्त झालें. या विविधतेंतील एकात्मतेचें सम्यग्दर्शन न झाल्यामुळे, तें करून घेण्याइतका व्यासंग व समज नसल्यामुळेच अनेक परकीयांना भारतीयत्व म्हणजे काय, हें समजेनासें झालें. "भारतीय माणूस" ही चीज त्यांना सांपडेनाशी झाली. परंतु स्वतंत्र भारताच्या उदयानंतर व दिवसानुदिवस होणाऱ्या आमच्या सांस्कृतिक विकासामुळे या बाबतींत आतां फारसा संदेह उरत नसावा. हा विकास होण्याच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दृष्टीनें भारतीयांनीं देखील या विविधतेंतील एकात्मतेची स्पष्ट जाणीव करून घेणें अवश्य आहे.

अशी ही जाणीव भाषाविषयक विचाराच्या साहाय्यानेच होणें शक्य आहे. भाषेची उत्पत्ति कशी झाली, एका भाषेंतून अनेक भाषा निर्माण होतात, का वेगवेगळ्या पोटभाषांच्या समन्वयांतून एक शिष्टसंमत भाषा निर्माण होते, आजपर्यंत ज्या पद्धतीने भाषांचा विकास होत राहिला तसाच आधुनिक यंत्रयुगीन संस्कृतीच्या युगांत होत राहील का, हें सर्व प्रश्न अजून विवाद्य आहेत. परंतु भाषेच्या मानवी जीवनावरील संस्कारशक्तीविषयी दुमत आढळणार नाही. एखाद्या जनसमूहाची समाजांत उत्क्रांति घडवून आणणाऱ्या, त्याला सुसंघटित, एकसंध बनविणाऱ्या ज्या वेगवेगळ्या संस्कारी शक्ति आहेत त्यापैकीं भाषा ही प्रमुख आहे. ही उत्क्रांति जसजशी होत जाते तसतशी भाषेचीही उत्क्रांति होत जाते. ती समृद्ध व निश्चितार्थ होते. तिचें क्षेत्र व्यापक होतें व अभिवृद्धीचें सामर्थ्य वाढतें. ती सामाजिक विकास घडविण्याचें प्रमुख साधन बनते, तशीच झालेल्या विकासाचें अचूक व सर्वग्राही प्रतिबिंबहि ती आपल्या अंतरंगांत सांठवून घेते. आणि म्हणूनच ती पुढील पिढीच्या प्रगतीचें स्फूर्तिस्थान बनते. आजची प्रत्येक प्रमुख भाषा युगायुगांत बदलत गेली आहे हें खरें, परंतु परिवर्तनशील अशा मानवी जीवनाच्या विविध अंगांमध्ये अधिकांत अधिक चिरस्थायी असें कांहीं असेल तर ती भाषा होय. साम्राज्यें लयास जातात धर्मसंस्थापकांचे प्रभाव कालांतराने फिके पडू लागतात, समाजव्यवस्थांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून येतें, परंतु कोणत्याहि उत्क्रांत, विकसित व प्रभावी समाजाच्या भाषेची मूलप्रकृति बदलत नाही. तात्कालिक संस्कारामुळे तिच्यांतील कांहीं शब्द गळतील, कांहीं नवे येतील, कांहीं प्रत्यय, उपसर्ग किंवा विभक्ति यांच्या उपयोगांत बदल होईल परंतु तिची मूळ शब्दसंपत्ति व वाक्यरचना, तिची मूलप्रकृति आमूलाग्र बदलत नाही. आधुनिक जीवनांत तर मुद्रण, ध्वनिलेखन इत्यादींच्या सहाय्यामुळे भाषेच्या स्वरूपाला एक वेगळें चिरस्थायित्व प्राप्त झालें आहे. अशी ही उत्क्रांत व सापेक्षतया तरी चिरस्थायी असलेली भाषा समाजाच्या इतर परिवर्तनशील अंगांचा इतिहासहि आत्मसात् करून सांठवून ठेवते. त्या समाजाच्या संस्कृतीची सर्वांगीण सांठवण करते. संस्कृति हा शब्द उच्चारतांच वादाचें मूळ आलें,असा समज रूढ आहे. परंतु संस्कृतीच्या प्रमुख अंगांचें स्थूलपणें व बालानांहि आकलनीय वाटेल असें विवरण करतांना सुप्रसिद्ध इंग्रजी तत्वज्ञ प्राध्यापक जोड यांनी केलेलें विवेचन लक्षांत घेण्याजोगें आहे. केवळ विशिष्ट रहाणी, विशिष्ट साधनांचा उपयोग,तऱ्हेतऱ्हेच्या सुखसोयी यांच्यावरूनच संस्कृतीचें खरें स्वरूप ठरत नाही, असें आपल्या छोट्या मैत्रिणीला पटवून दिल्यावर प्रा. जोड यांनी तिला हेंहि समजावून सांगितलें कीं, संस्कृतीचा आविष्कार मुख्यत: तीन मार्गांनी होतो–तऱ्हतऱ्हेच्या सौंदर्य निर्मितीमध्ये, स्वतंत्रप्रज्ञ नवविचार व तत्वसंशोधन यामध्ये व सामाजिक सहजीवनाच्या संयोजनामध्ये. यापैकीं सौदर्य निर्मितीच्या प्रयत्नांतून व हव्यासांतून कलाकृतींच्या व साहित्याचा उद्भव होतो. स्वतंत्रप्रज्ञ नवविचार व तत्वशोधन यांतून पुन: साहित्य आणि शास्त्रें व तत्वज्ञान यांचा उगम होतो. सामाजिक सहजीवनाच्या संयोजनांतून आचारधर्म, समाजशासन, राज्यशास्त्र इत्यादींचा विकास होतो. यापैकीं कांही कला सोडल्या तर बाकी सर्वांना भाषेच्या द्वारेंच अभिव्यक्ति मिळते व शब्दांहून अन्य साधनांचा आश्रय घेणाऱ्या कलांचा देखील पुढें अप्रत्यक्षरीत्या शब्दांमध्ये, भाषेमध्ये आविष्कार होतो. त्यांनाहि साहित्यामध्ये स्थान मिळतें. म्हणूनच म्हटलें गेलें कीं,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

न सोऽस्ति प्रत्ययो लोके यः शद्बानुगमादृते ।
अनुविद्धमिव ज्ञानं सर्वं शद्बेन भासते ।।

अशा प्रकारें भाषेच्या द्वारेंच लोकांच्या जीवनांतील अनेकविध प्रतीतींना अभिव्यक्ति लाभते. त्या प्रतीतींचा विकास होतो. त्यांना स्थिर स्वरूप मिळतें. आणखी एक विशेष लक्षांत घेण्यासारखें सत्य हें कीं, लोकजीवनांतील प्रतीतींच्या संचिताचें हें वैभव पिढयानुपिढयांच्या वारसदारांना पोंचविणारी ही भाषा म्हणजे त्या समाजांतील कोणत्याहि एका वर्गाची निर्मिती किंवा एका वर्गाची मिरासदारी नसते. समाजजीवनासाठीं म्हणजेच सर्व वर्गांच्या परस्पर संबंधासाठी, सर्व वर्गांतील व्यवहारासाठी ती निर्माण झालेली असते. व म्हणून प्रत्येक वर्गाच्या जीवनानें तिचें स्वरूप आकारास आणलेलें असतें. आजच्या प्रगत युगांत देखील तिच्याइतकी सर्वाश्लेषी शक्ति दुसरी आढळणार नाही. लहानथोर, उच्च-नीच, अ-धार्मिक नि-धार्मिक पक्षोपपक्षीय सर्व लोक स्वभाषेच्या छत्राखालीं सारख्याच पदवीनें वावरतात.

भारतांतील वेगवेगळ्या भाषिक विभागांचा व त्यांच्या संस्कृतीचा विचार करतांना या सर्व गोष्टी विचारवंतांनी लक्षांत घेणें अवश्य आहे. या प्रमुख भाषांचें सातत्य राखल्यानें, त्यांच्या वैशिष्टयाचा मान राखल्यानें त्यांच्या विकासाचा मार्ग निष्कंटक केल्यानेंच भारतीय संस्कृतीच्या विकासाचा मार्ग निष्कंटक होणार आहे. या प्रमुख भाषांच्या द्वारें त्या त्या समाजाची परंपरा आदरली गेली व आमच्या विविधतेनें नटलेल्या परंतु तरीहि एकसंघ अशा भारतीयत्वांत ती समाविष्ट झाली, तरच नवभारताच्या राष्ट्रीयत्वांत सांस्कृतिक आशय भरला जाणार आहे. शासनाच्या सोयीसाठीं, किंवा केवळ व्यावहारिक निर्वाहाच्या मतलबासाठीं उद्योगधंद्याच्या सुकरतेसाठी, किंवा अशाच कांहीं केवळ दैनंदिन कार्यासाठी, केवळ एका भाषेवर भर देऊन या सर्व भाषिक समूहांच्या पुण्यसंचयाकडे जर आपण पाठ फिरवूं तर संस्कृति नांवाची चीज तर आपणाजवळ राहणार नाहीच, पण राष्ट्र म्हणून तरी आपण टिकूं कां नाही याची शंका वाटते. कारण त्यामुळे लोकजीवनांतील सर्व स्फूर्तिस्थानांना आपण मुकूं. लोकजीवनांवरील सर्व चिनयनशील शक्तींना आपण पारखे होऊं. ज्यामुळें लोकांना राष्ट्र आपलेसे वाटावें, त्यांच्या जीवाचे बंध तेथें जडावे असें कांहींहि उरणार नाही. सबंध जीवन केवळ वित्तनिष्ठ म्हणजेच भाडोत्री होईल.

अशा प्रकारची समस्या केवळ आपल्या देशांतच आहे, असेंहि नाही. "दि जीनियस् ऑफ यूरप" या आपल्या ग्रंथांत सुप्रसिद्ध विचारवंत हॅवलॉक एलिस यांनी युरोपांतील प्रत्येक राष्ट्राच्या सांस्कृतिक व्यक्तित्वाचा व त्या त्या राष्ट्राच्या, एकसंघ समजल्या जाणाऱ्या युरोपीय संस्कृतींतील अंशभागाचा, पूरकत्वाचा मोठ्या साक्षेपानें विचार केला आहे. संकृतीचें मूळ प्रादेशिक परिस्थितींत, वास्तव लोकजीवनांत खोल रुजलेलें असतें, व ह्मणून संस्कृति लोकजीवनाच्या प्रादेशिक परिस्थितीनें निर्णीत होते, हें त्यांनी सिद्ध केलें आहे. हा खंडव्यापी विचार झाला, राष्ट्र दृष्टीचा नव्हे, असें आपणांस वाटेल. परंतु याप्रमाणेच इंग्लंडच्या संस्कृतीचा विचार करतांना टी. एस्. एलियटनेहि देशाच्या एकेका विभागांतील ह्मणजे प्रादेशिक संस्कृतीचा राष्ट्रीय संस्कृतींतील वांटा किती मोलाचा असतो, याचें स्पष्टपणें विवेचन केलें आहे. मनुष्याच्या संस्कृतीचें मूळ वस्तुतः तो रहातो त्या परिसरांत व तो बोलतो त्या भाषेंत असतें, असें प्रतिपादन करून स्कॉटलंड, वेल्स, व इंग्लंड यांनी परस्परांच्या सांस्कृतिक

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वृत्तीकडे या दृष्टीने पाहिलें तरच इंग्लंडची संस्कृति जिवंत व विकासशील राहील, असेंहि त्यांनी ह्मटलें आहे.

या प्रकारची भाषाविषयक विचारसरणी आपण सर्वांनी अर्थातच अनेकदा ऐकली असेल. भाषावर प्रांतरचनेचा पुरस्कार करतांना या विचारसरणीचा उच्चरवाने पुरस्कार केला जातो. व ती राष्ट्राच्या आजच्या नेत्यांसमोरहि मांडली जात असावी. हा विचार लक्षांत घेऊन सर्व भाषाभगिनींचें संसार स्वखुषीने वेगवेगळे मांडले जाणें जितक्या लवकर शक्य होईल तितकें आपल्या राष्ट्रकुटुंबाच्या स्नेहबंधनाला, सौख्याला व सुरक्षिततेला पोषक असेंच होईल, हें खरें. परंतु तें होईपर्यंत आपण स्वतः आपल्या भाषिक व्यक्तित्वाच्या दृष्टीने, आपल्या भाषिक परंपरेच्या रक्षणाच्या दृष्टीने जें करणें अवश्य आहे, तें तरी करीत आहोंत कां, हा प्रश्न आपण स्वतःला विचारणें अवश्य होऊन बसलें आहे. मराठीवर होणाऱ्या आक्रमणाविषयीं आपण बोलतों ; सीमाप्रदेशांतील परिस्थितिविषयीं संमेलन प्रसंगीं वा अन्य सभांच्या वेळीं आपण चिंता व्यक्त करतो. हें अवश्य आहे, आपलें कर्तव्य आहे, व तें आपण प्रामाणिकपणें व उत्साहाने करतो, हें ठीकच झालें. परंतु या सर्वांच्या पाठीमागे सांस्कृतिक दृष्टचा स्वभाषेला लोकजीवनांत व व्यक्तिजीवनांत केवढें महत्वाचें व जिव्हाळ्याचें स्थान आहे, याची जिवंत जाणीव असतेच असें नाही. निदान ही जाणीव जितक्या उत्कटपणे व व्यापकपणे असावयास पाहिजे तितकी नसते, असा अनुभव आहे. एवढेंच नव्हे, आपल्यापैकी अनेक मंडळी, या प्रश्नाविषयी उदासीनहि असल्याचें आढळून येतें. आपल्या दैनंदिन, कौटुंबिक प्रश्नांत मग्न असलेल्या, किंवा धंद्यांत गढून गेलेल्या मंडळींची अशी गाढ समजून असते की हें मराठीपण, हा भाषाविषयक आग्रह हा एक तर राजकीय उलाढाल्या करणाऱ्या मंडळींचा एक नसता उद्योग आहे किंवा साहित्यिक लोकांनी आपल्याच प्रतिष्ठेसाठी माजवलेलें खूळ आहे. त्यांच्या स्वतःच्या धंद्यांत चुरस उत्पन्न झाली, किंवा नोकरींत अडचणी आल्या तर मात्र त्यांना अशा चळवळींची गरज वाटते. या प्रश्नाच्या शैक्षणिक बाजूकडे देखील विशेष दक्षतेने पाहण्यास ही मंडळी तयार नसतात व ह्मणूनच व्यवहाराच्या निर्वाहासाठी इंग्रजी आमची अभिषिक्त साम्राज्ञी होती,तेव्हां त्यांनी आपल्या मुलांना, कित्येकदा दुसरी सोय असतांनाहि इंग्रजीतून शिकविलें व आज सर्व शिक्षण हिंदींतून देण्यास त्यांची तयारीं असते. राष्ट्रीयत्वाच्या नांवाखालीं अनेकदा शिक्षणविषयक अनास्था व केवल प्राप्तकालावर दृष्टि ठेवून वागण्याची वृत्ति लपलेली असते. या वृत्तीने या मंडळीचे काय कष्ट वाचत असतील ते वाचोत, किंवा त्यांच्या प्रतिष्ठेंत काय भर पडत असेल ती पडो. त्यामुळे आमच्या भावी पिढीचें मात्र अपरिमित नुकसान होत आहे. या बाबतींत केवळ एकच विचार आपणासमोर मांडण्याची मी परवानगी घेते.

आजच्या आमच्या जीवनांत अनेक उणीवा आहेत, अनेक प्रकारची टंचाई व दारिद्र्य आहे, हें सत्यच आहे. परंतु त्यांतल्या त्यांत एक फार मोठी उणीव—सहज किंवा अल्पावकाशांत भरून न निघणारी उणीव—ह्मणजे पूर्ण विकसित मनाच्या व्यक्तींची होय. आज जीवनाच्या कोणत्याहि क्षेत्राकडे पाहिलें तरी विकसित, एकसंघ व्यक्तित्वाचीं, समतोल वृत्तीचीं, विनीत विचारांची व ह्मणून खरी कार्यक्षम अशीं माणसें सांपडणें कठीण झालें आहे. गेल्या अनेक वर्षांतील आपल्या सांस्कृतिक अवकळेचा हा प्रत्यक्ष परिणाम आहे. पाणी न मिळालेलें रोंपटें खुरटून जावें, आई वेगळें निघालेलें कोंवळें मूल सुकून जावें, तशी या काळांतील आमच्या वाढत्या वयाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साधारण व्यक्तींची अवस्था झाली ; जित आणि जेते यांच्या परस्पर संबंधामुळें निर्माण होणारी सांस्कृतिक समस्या ही एक विचित्र व विषादपूर्ण अशीच घटना असते. अशा दुर्घटनेंत सांपडल्यावर कांही अलौकिक व्यक्ति वाघिणीचें दूध प्याल्याप्रमाणे अधिक प्रभावी, अधिक चैतन्यपूर्ण बनतात व इतरेजनांनाहि चेतवण्याचा प्रयत्न करतात. परंतु सर्वसाधारण व्यक्ति स्वाभाविक वातावरणांतून भलतीकडे फेकल्यासारखी खुरटून जाते, स्वत्वशून्य बनते. तिची वाणी नेभळी, घेडगुजरी बनते. तिची रहाणी कळानष्ट, खिचडीवजा होते. परदास्याचा जसा हा परिणाम, त्याचप्रमाणे, कोणतीहि एक प्रादेशिक संस्कृति वा तिची वाहक व रक्षक अशी भाषा इतरांवर लादली केल्यास वा लादली जाईल अशी विभागरचना व शासनयोजना केली गेल्यास हीच अवस्था होईल, हें निःसंशय. आजहि अशा अवस्थेचीं चिन्हें दिसत आहेत. आमची वाणी घेडगुजरी, आमचें वागणें कळानष्ट व रहाणी खिचडीवजा होत चालली आहे. हा प्रकार आता आमच्या वाढत्या वयाच्या पुढल्या पिढीसाठीं तरीं बंद होणें आवश्यक झालें आहे. भारताच्या प्रत्येक प्रादेशिक घटकाला आपल्या उगवत्या पिढीला आपल्या विशिष्ट संस्कृतींत वाढविण्याची, आपल्या परंपरेच्या जीवनावर फुलविण्याची संधि मिळणें अवश्य आहे. असें झालें तरच त्या पिढीचा पायाशुद्ध विकास होईल व अशांचेंच भारतीयत्व आशयपूर्ण होईल. हा सर्व आग्रह अखेर भारतीयत्वाच्या परिपोषासाठीच धरणें आवश्यक आहे. गंगायमुनांचे प्रवाह अखेर सागरांत विलीन होणार असले तरी, गंगामाई दुभडी भरून वहावी म्हणून, यमुनेचें चैतन्य अबाधित रहावें म्हणून त्यांना हिमालयाच्या कुशींतून हिमसंचयाचा पुरवठा व्हावाच लागतो ना ? प्रादेशिकतेखेरीज भारतीयत्व ही आजची एक केवळ पोकळ कल्पना आहे, भ्रामक वडिवार आहे. मुळाशिवाय झाड असावे, असें म्हणण्याइतकें अवास्तव आहे. हा वडिवार व ही अवास्तवता बाजूला सारून आगामी पिढ्यांच्या हिताच्या व भारतीयत्वाच्या सातत्याच्या दृष्टीनेच प्रादेशिक संस्कृतीना सुरक्षित, निरामय व आदराचें वातावरण निर्माण करून देणें हें राष्ट्रीय कर्तव्य ठरतें.

प्रादेशिक संस्कृतीचें सातत्य राखण्याचा पहिला व सर्वश्रेष्ठ मार्ग म्हणजे प्रादेशिक वाङ्मयाचें परिशीलन हा होय. स्वभाषेंतील वाङ्मयाचा प्रसार करणें, त्याच्या परिशीलनाला उत्तेजन देणें, वाङ्मयविषयक अभिरुचीला वळण देऊन तिच्या विकासाला साह्य करणें हेंच वाङ्मयाचें साहित्य संस्थांचें प्रमुख कार्य आहे. व या कार्याचें महत्व केवळ साहित्यापुरतें नाही. समाज जीवनाची पातळी व संस्कृतीचें सातत्य त्यावर अवलंबून आहे. परंतु याहि बाबतीत वेगवेगळ्या प्रकारची अनास्था दिसून येते. मराठी पुरतेंच बोलायचें तर बरेच उच्चभ्रू लोक जुनें मराठी वाङ्मय जुनें म्हणून वाचीत नाहीत. व नव्या मराठी वाङ्मयांत आहेच काय, असा समज करून घेऊन तें हि वाचीत नाहीत. अधल्या मधल्या बहुसंख्य लोकांना जुन्या वांङ्मयाच्या अस्तित्वाचा विसरच पडल्यासारखा असतो, व नव्यांतलें सहज हातीं लागेल, सहज डोक्यांत शिरेल, एवढेंच वाचण्याइतकी बौद्धिक शक्ति दिवसासाठी त्यांच्याजवळ शिल्लक असते. एके काळीं धर्मकृत्यांच्या मानसिक आवश्यकतेमुळे जें पठण वा परिशीलन होत असे त्यालाहि आज आमच्या जीवनांत स्थान राहिलें नाही व त्यामुळे खरोखरच आमच्यावर सांस्कृतिक दिवाळखोरीची वेळ येऊन चुकली आहे. आज आमच्या या पिढीचें अरसीं परसीं जें काय व्हायचें तें ठरून गेलें आहे. परंतु अशा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांस्कृतिक पातळीचे आह्मी आमच्या पुढच्या पिढ्यांना काय वारसा देणार याची खरोखर चिंता वाटावयास पाहिजे. सर्वसाधारण मराठी भाषिकांच्या संबंधी बोलायचें तर आह्मी अभिरुचीच्या, व्यासंगाच्या, साहित्यास्वादाच्या कोणत्या श्रेयस्कर परंपरा पाडल्या आहेत वा कायम ठेवल्या आहेत, हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. आमचें मराठीपण राखण्याचा एवढा एकच मार्ग असतांनाहि आह्मी हें अर्तव्य चोखपणे बजावीत आलों आहों असें ह्मणतां येत नाही. व त्यामुळे यदाकदाचित् केव्हा तरी अखंड महाराष्ट्र होईल, पण तोंवर मराठीपण टिकेल ना, कां तो महाराष्ट्र हा केवळ एक भौगोलिक विभाग होईल अशी कुशंका—विशेषत: मध्यप्रदेशासारख्या द्विभाषी राज्यांत–मनांत उद्भवल्याशिवाय रहात नाही. व ह्मणून आजच्या प्रसंगीं आपणांस विनंति ही की आपलें मराठीपण ही एक जागती निष्ठा बनवण्याच्या उद्योगाला आपण लागूं या. बंगाली लोकाचें बंगालीपण, गुजराथी मंडळीचें गुजराथीपण हिंदी लोकाचें हिंदीपण या सर्वांना समान आदरानें लेखूं. त्यांच्या सहाय्यानेच आपलें भारतीयत्व बनतें याची आठवण ठेवूं. त्यांच्या व आपल्या पूर्वसंचितत्वाच्या समानत्वाची आठवण ठेवूं, तशी आजच्या भारतीयत्वांतील आपणा सर्वांच्या समभागीत्वाचीहि जाणीव ठेवूं, पण ह्मणूनच आमच्या मराठीपणाचीहि जपणूक करण्याची प्रतिज्ञा करूं. त्यासाठी मराठी भाषा व मराठी साहित्य यांच्या अभ्यासाचा व परिशीलनाचा प्रसार करूं. जुन्या मराठी वांङमयाच्या थोरवीबद्दल मी आज नव्याने आपणांस कांही सांगावे, असें नाही. मध्यंतरीच्या पिढींतील वामन मल्हार, केतकर, वरेरकर, केशवसुत, गोविंदाग्रज, माधव ज्युलियन, खाडिलकर, कोल्हटकर, केळकर, इत्यादींच्या, साहित्यनिर्मितीलाहि आज मानाचें स्थान मिळालें आहे. परंतु आजच्या मराठी वाङमयाची एक निष्ठावंत पण चोखंदळ वाचक या नात्याने त्याहि विषयी मी एवढे निश्चितपणे ह्मणेन की, त्याचा कितीतरी भाग असा आहे की ज्याच्याविषयी कोणाहि सुबुद्ध रसिकाला अभिमान वाटावा. आजच्या मराठी काव्याच्या स्वरूपाविषयी आपण सांगोपांग चर्चा करणार आहांतच. त्यामध्यें आज दोन प्रमुख प्रवृत्ति आढळून येतात. त्यापैकी एक निराशावादी, वैफल्य भावनेनें ग्रासलेली आहे व दुसरी मानवतेवरील विश्वासाने व जीवन नव्याने घडविण्याच्या आकांक्षेने प्रस्फुरित झालेली आहे. परंतु दोन्ही प्रवृत्ति प्रतीतिपूर्ण व सच्च्या आहेत, प्रयोगशील आहेत ; मराठी काव्याला नावीन्याचा जोम आणणाऱ्या आहेत, तशाच मराठी अनुभूतीला व आकांक्षांना अभिव्यक्ति देणाऱ्या आहेत. आजच्या मराठी काव्यांत नाजूक, तरल व्यक्तिभावनेची गुंफण आहे ; तशी विश्लेषणपर चिंतनशीलताहि आहे. आजच्या भावगीतांत दंवबिंदुसारखी कोमल स्वयंपूर्णता आहे तर खंडकाव्यांत मानवनिष्ठ विचाराची व्यापकता आहे व हे दोन्ही प्रकार आपलें स्वतःचें असें अभिव्यक्तीचें तंत्र व "प्रसादनाचें अभिव्यक्त शासन" निर्मीत आहेत. आजची लघुकथा केवढ्या मोठ्या वादाचा विषय झाली आहे! व त्याचेंहि कारण तिच्यांत आलेलें नवजीवनाचें चैतन्य हेंच होय. केवळ कथानकाकडून मनोव्यापाराच्या गुंतागुंतीकडे ती वळली आहे ; बाह्य घटनांपेक्षा व्यक्तीच्या भावभावनांची तिला अधिक मातबरी वाटूं लागली आहे. व या भावनांचा ती सूक्ष्मपणे पण तितक्याच मानव्याने शोध करीत आहे. मराठी कादंबरीच्या क्षेत्रांत केवळ कलानंदाचा पुरस्कार करणाऱ्या मंडळींनाहि आता व्यापक व समाजनिष्ठ विचार करण्याची आवश्यकता पटूं लागली आहे व आजच्या कांही अग्रेसर कादंबरीकारांनी स्वभावचित्रण, सामाजिकता, व्यक्तिगत अनुभूतीचा प्रामाणिकपणा व त्याबरोबरचा भाषा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शैलीचें सौंदर्य यांचीं नवीं क्षितिजें निर्माण केलीं आहेत. मराठी टीका ठरीव ठशाच्या परीक्षणाच्या बाहेर पडली आहे. कलेसाठी कला कां जीवनासाठी कला यासारख्या ठराविक प्रश्नांच्या दुष्ट वर्तुळाच्याहि ती बरीच बाहेर पडूं लागली आहे. कोठल्याहि कृतीचें मूल्यमापन करतांना त्या त्या साहित्यप्रकाराच्या मूलभूत तत्वाविषयी विचार करण्याची धमक तिच्यामध्यें येऊं लागली आहे. कलावंताच्या अनुभूतीचें प्रामाण्य व कलाकृतीची सामाजिकता या दोन्हीचा समतोलपणे विचार करण्याची आवश्यकता प्रतिपादली जाऊं लागली आहे. जुन्या ग्रंथांचें व्यासंगपूर्ण संशोधन फार मोठ्या प्रमाणांत होऊं लागलें आहे. अनेक साहित्यविषयक प्रश्नांवर परिश्रमपूर्वक प्रबंध विद्यापीठांतील सर्वोच्च श्रेणींतील विद्यार्थ्यांकडूनहि लिहिले जाऊं लागले आहेत. अशा रीतीनें मराठी साहित्याच्या कोणत्याहि अंगाकडे आज आपण पहाल तर आपल्याला मधल्या काळांत आलेली जीवनविमुखता व शैथिल्य जाऊन नवचैतन्याचा बहर आलेला दिसेल. हें कार्य करणाऱ्या व्यक्ति थोड्याच असतात. परंतु त्या थोड्यांच्या कार्याचें चीज आपण अनेकांनी करावयाचें असतें.

कांही आक्षेपकांच्या मताप्रमाणे आजच्या मराठी वांङ्मयांत कांही हीन प्रवृत्ति आढळतात ; हें कांही अंशीं खरेंहि आहे. परंतु जेथे मुळांत विकसित व्यक्तित्वाच्या माणसांचीच वाण तेथे वांङ्मयांत कांहीसा बेतालपणा झाल्यास आश्चर्य काय ? शिवाय याहि बाबतींत ज्या गोष्टीचें स्मरण ठेवणें अवश्य ती ही की रसिकांची अभिरुचि हीच सामान्य लेखकाला वा कलावंताला ताळ्यावर ठेवणारी खरी शक्ति. एवढेंच नव्हे ; या अभिरुचीला वश करून घेऊन तिला आपल्या अनुभूतीचा साक्षात्कार घडवणें, ही उच्चतम कलावंताचीहि एक सुप्त आकांक्षा असते. उच्चतम कलावंताकडून मिळणाऱ्या या मानाला पात्र होणें, व सामान्य कलावंताच्या बाबतींतील आपला अधिकार बजावणें हें आपलें सर्वांचें कर्तव्य आहे. जुन्या व नव्या मराठी वांङ्मयाचें परिशीलन, प्रसार व आस्वाद यांच्या द्वारेंच आज मुख्यतः आमच्या मराठीपणाची जपणूक होणार आहे. हेंच आपलें प्रमुख कार्य आहे, याची विदर्भ साहित्य संघाला स्पष्ट जाणीव आहे. या कार्यांत आपण सर्व सहकारी व्हाल अशी आशा आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आचार्य विनोबांचा विदर्भ साहित्यसंघाला आशीर्वाद

स्थाई पत्ता :
गांधी आश्रम, हज़रत गंज,
लखनौ

फैजाबाद, ता. १-५-५२

श्री. रानडे,

ता. २५-४ चें आमंत्रण मिळालें. विदर्भ साहित्यसंघाचें अधिवेशन जबलपूरला होत आहे. या घटनेचें मी स्वागत करतों. "सबै भूमि गोपाल की"-सबंध हिंदुस्थान आपल्या सर्वांचा आहे. कोणत्याहि भाषेच्या साहित्याचें संमेलन कोणत्याहि प्रांतांत व्हावें आणि सर्वांनी त्याचें सप्रेम स्वागत करावें, अशी आपल्या हिंदुस्थानची खानदानी आहे. हिंदी तर राष्ट्रभाषा असल्यामुळें हिंदीचें साहित्य-संमेलन कोणत्याहि प्रांतांत सहज होऊं शकेल, पण कन्नड भाषेचें साहित्यसंमेलन बंगालमध्यें व्हावें, बंगालीचें गुजरातमध्यें व्हावें, गुजरातीचें तेलंगणांत व्हावें, तेलंगणाचें विदर्भांत व्हावें आणि विदर्भाचें जबलपूरला व्हावें, यांत सारी गोडी आहे. कुणाचें कुणावर आक्रमण नाही आणि सर्वांचें सर्वांना आमंत्रण. या विशाळ दृष्टीनें विदर्भ साहित्यसंघाचें अधिवेशन जबलपुरांत चांगलें पार पडो आणि सर्व साहित्यिकांनी मान्य केलेली सर्व-जन-सुलभ, हित-मित-मधुर वैदर्भी रीति सर्व भारतीय साहित्यांत पसरो.

मी भूदान-यज्ञाचा पुरोहित झालों आहें, हें आपणांस विदितच आहे. माझ्या साहित्यिक बंधु-भगिनींकडून मी यथाशक्य भूदानाची आणि प्रेरक वाग्-दानाची अपेक्षा बाळगीत आहें.

विनोबाचे प्रणाम

★

ना. लो. ना. माधव श्रीहरि अणे, राज्यपाल, बिहार यांची शुभेच्छा

"Thanks invitation. Regret inability attend. Under guidance of Kusumavati Deshpande and other literary men of Mahavidarbha, have Confidence Sammelan will be great success. I congratulate Doctor Pendse on election as President for next year. I hope Sangha will make good progress under his able supervision and leadership.

Aney, Governor Bihar"

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" युगवाणी " (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्यांकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें
विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

मासिक, जून १९५२

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ